जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## अमर्याद लोभ - माया

सुप्रसिद्ध जिब्रानचे एक सुंदर रुपक आहे. एक महाभयंकर राक्षस एकसारखा पृथ्वीच्या पोटातून येणारा प्रत्येक पदार्थ अधाशीपणे आपल्या घशात ढकलत होता अन् समुद्राचे पाणी घटाघट पीत होता. मी त्याला विचारले, अरे तुझे अजूनही पोट भरल्याचं समाधान होतच नाही का?

राक्षस उत्तरला, ''माझं पोट खूप भरलंय. उलट आता मला खाण्यापिण्याचा कंटाळा आला आहे. मला ही एक भीती वाटते - आज मी स्वस्थ बसलो, तर कदाचित उद्या मला पृथ्वीवर एक पदार्थही शिल्लक उरणार नाही. मला प्यायला समुद्रात पाण्याचा थेंबही उरणार नाही.

अंधपणाने अमर्याद धनसंचय करणाऱ्या अन् त्या पैशांच्या सहाय्याने जगावर सत्ता गाजवू पाहणाऱ्या आधुनिक पुंजीपतीवर व भांडवलदारांवर हे मोठे सूचक रूपक आहे.

वाचनीय मननीय – प्रेरणादायी अक्षरधन – संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



मस्तकावर सुवर्णमुकुट मिरवित हे लोक मानवतेने मोठ्या कष्टाने जीवनाच्या पूजेकरिता गोळा केलेली फुले आपल्या पोलादी टाचांखाली अहर्निश चिरडून टाकीत असतात. लोभ हाच त्यांचा परमेश्वर बनलेला असतो. त्याचा लोभ वाढतच जातो. तृप्ती हा शब्दच पुंजीपतीच्या कोशात कधी असू शकत नाही.

प्राचीन भारतीय संस्कृतीत मनुष्याच्या प्रगतीआड येणारे ६ शत्रू मानले असून, त्यात कामवृत्तीला अग्रक्रम दिले आहे. पण आजच्या जगाकडे पाहिल्यावर मानवतेचा, मानवी आत्म्याचा सर्वात मोठा शत्रू (पैसा व) लोभच आहे हे नाकारता येणार नाही.

# कत्तलीकरीता म्हशींची बेकायदा वाहतूक करणारा टेम्पो पकडला

### पोलिसांनी ८ म्हशींची केली सुटका,९ लाखाच्या मुद्देमालासह एकाला घेतले ताब्यात

नगर - टेम्पोमध्ये म्हशी दाटीवाटीने कोंबून कत्तलीकरता घेऊन जाणारा टेम्पो कोतवाली पोलिसांनी पकडला. या कारवाईत आठ म्हशींची सुटका करून एकास ताब्यात घेतले. ही कारवाई नगर पुणे रोडवरील केडगाव बायपास येथे २२ मार्च रोजी पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास केली.




कोतवाली पोलीस रात्री शहर हद्दीत गस्त घालीत असताना त्यांना माहिती मिळाली की एक आयशर कंपनीचा टेम्पोमध्ये म्हशी दाटीवाटीने कोंबून कत्तलीकरिता पुणे रोडने नगर शहराकडे येत आहे. अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलीस पथक तातडीने त्या ठिकाणी गेले असता एक आयशर टेम्पो (क्र. एम एच ०४ एच वाय ५५४०) नगर कडे येताना दिसला. पोलिसांनी टेम्पो थांबवून टेम्पो चालकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव अमर इलाही शेख (वय ४० रा. उंदरी गाव, ता. हवेली जि. पुणे ) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्या टेम्पोची झडती घेतली असता टेम्पोत दाटीवाटीने बांधलेल्या आठ म्हशी मिळून आल्या.

पोलिसांनी ५ लाख रुपये किमतीचा आयशर टेम्पो व ४ लाख रुपये किमतीच्या ८ म्हशी असा ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी सहाय्यक फौजदार लक्ष्मण बोडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमर शेख याच्याविरुद्ध प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११ (च) (घ) (ड), सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ६, ९ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली.

# चाकू, गज, कटरसारखी हत्यारे घेवून व्यापाऱ्याच्या घरावर दरोड्याचा प्रयत्न

(पान १ वरुन)

२२ मार्चला पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास ५ दरोडेखोर आले होते. त्यांच्याकडे चाकू, लोखंडी गज, टामी, कटरसारखी हत्यारे होती. बंगल्याची सुमारे १० फुट उंच असलेल्या संरक्षक भिंतीवरून उड्या मारून या दरोडेखोरांनी बंगल्याच्या आवारात प्रवेश केला. सर्वांनी हुडी असलेले टी-शर्ट घातलेले होते. तोंडाला मास्क बांधलेले होते. सर्वांच्या हातात हातमोजे आणि पायात स्पोर्ट्सचे शूज होते.

हे दरोडेखोर बंगल्याच्या आवारात कानोसा घेत वावरत असताना कशाचा तरी आवाज होवून त्यांची चाहूल लागून चंगेडीया कुटुंबीय झोपेतून जागे झाले. त्यांनी सीसीटीव्हीत पाहिले असता त्यांना बंगल्याच्या आवारात दरोडेखोर वावरताना दिसले. त्यामुळे ते अगोदर प्रचंड घाबरले. त्यांनी शेजारी राहणाऱ्या काहींना फोन करून चोरटे आल्याची माहिती दिली. काही वेळातच परिसरातील अनेक जण जागे झाले आणि त्यांनी सर्वांनी एकाच वेळी चोर चोर असा आरडा ओरडा सुरु केला. सर्व बाजूने झालेला आरडाओरडा ऐकून दरोडखोर बंगल्याच्या पाठीमागील बाजूच्या संरक्षक भिंतीवरून उड्या मारून अंधारात पसार झाले.

### चोरट्यांच्या कारमध्ये सापडली हत्यारे

हे दरोडेखोर एका विनाक्रमांकाच्या मारुती इको कार मधून आले होते. ती कार त्यांनी बंगल्याच्या पाठीमागील बाजूस अंधारात उभी केलेली होती. मात्र पळून जाताना त्यांनी कार तेथेच सोडून दिली. काही वेळाने नागरिक बाहेर आले तेव्हा सदर कार त्यांच्या निदर्शनास आली. या कारची पाहणी केली असता त्यात दरोड्यासाठीची काही हत्यारे आढळून आली. थोड्या वेळाने पोलिस आल्यानंतर ती कार पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली आहे.

### चोरट्यांना पोलिसांची भीतीच उरली नाही : गणेश भोसले



बुरुडगाव रोडवरील साईनगरमध्ये व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक नागरिक मोठ्या संख्येने राहत असून, दरोडेखोरांनी या परिसरात ६ महिन्यांपासून चोऱ्यांचे सत्र सुरू ठेवल्यामुळे नागरिक भयभीत झाले आहे. दरोडेखोर अक्षरक्ष: चारचाकी गाडीने येत बंगल्याच्या बाजूला गाडी लावत धारदार शस्त्र हातात घेऊन बंगल्यात शिरत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे असताना देखील बिनधास्तपणे दरोडेखोर चोरी करण्याचा प्रयत्न करत आहे त्यांना कुठलीही भीती उरली नाही. नागरिकांच्या सतर्कतेमुळे योगेश चंगेडिया यांच्या घरी दरोडा होता-होता वाचला. गेल्या ६ महिन्यांपासून साईनगर परिसरामध्ये चोरीच्या अनेक घटना घडल्या असून, रवी शेलोत यांच्या घरी जबरी चोरी झाली असून, आतापर्यंत कुठलाही सुगावा लागला नाही. पोलीस नेमके काय करतात हे देखील माहित नाही.

नागरिकांनी पोलिसांना विचारल्यावर उडवा उडवीची उत्तरे देतात. नागरिकांना वेड्यात काढण्याचे काम करत आहे. पोलिसांचे लक्ष फक्त पैशावर आहे, पैसे कमावणे हाच उद्देश असून, शहरात राजरोज मटका, जुगार, बिंगो असे २ नंबरचे धंदे सुरू आहेत. फक्त पोलीस प्रशासन हप्ते गोळा करण्यात पटाईत आहे. शहरातील नागरिकांचे संरक्षण वाऱ्यावर सोडून दिले आहे, त्यामुळे शहरातील नागरिक सुरक्षित नाही. रात्री कुठेही गस्त दिसत नाही. फोन केल्यानंतर पोलीस अर्ध्या ते पाऊण तासाने येत असेल तर याचा अर्थ पोलीस झोपलेले आहे. पोलीस जर वेळेवर आले असते तर रात्री नागरिकांच्या सहकार्यातून चोरांना जेरबंद करता आले असते, मात्र पोलीस प्रशासन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न गांभीर्याने घेत नसल्याचा आरोप माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी केला.

### शेजारील मित्रांच्या सहकार्यामुळे आम्ही वाचलो : योगेश चंगेडिया



बुरुडगाव रोडवरील साईनगर येथे माझे घर असून, पहाटे ३ वाजता आवाज आला. घराच्या आवारामध्ये कोणीतरी शिरले असल्याचे जाणवले, त्यावेळी आम्हाला सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये २ दरोडेखोर दिसले आणि आम्ही खिडकीतून डोकावून पाहिल्यानंतर अजून ३ जण उभे होते. धारदार शस्त्र त्यांच्या हातात होती व ते घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होते. मात्र आम्ही शेजारील मित्रांना फोन लावला त्यांनी तातडीने लोकांना जमवले तेव्हा हे चोर पळून गेले, त्यानंतर आम्ही १०० नंबरला फोन लावला मात्र त्यांच्याकडून कुठल्याही उपयोजना झाल्या नाही. त्यानंतर आम्ही कोतवाली पोलीस स्टेशनला फोन लावल्यानंतर अर्ध्या ते पाऊण तासांनी पोलीस आले, तोपर्यंत चोर चारचाकी गाडी सोडून पळून गेले. ती गाडी देखील कल्याण रोड वरून चोरून आणली होती. आम्हाला जर आवाज आला नसता तर आमच्या घरात एखादी मोठी दुर्घटना घडली असती. सुदैवाने कुठली घटना घडली नाही. शेजारी असणाऱ्या नागरिकांच्या सहकार्यामुळेच हे चोर पळून गेले. हे सर्व पूर्वनियोजित असल्यासारखे वाटत असून, पोलिसांनी तातडीने तपास करून दरोडेखोरांना अटक करावी, अशी मागणी योगेश चंगेडिया यांनी केली. तर रवींद्र सेलोत यांनी या साईनगर भागात पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे.

# बसस्थानकातून प्रवाशाच्या सोन्याच्या दागिन्याची चोरी

नगर - एसटी बस मध्ये बसण्याकरिता आत प्रवेश करीत असताना त्यावेळी झालेल्या गर्दीचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात चोरट्याने प्रवाशाच्या गळ्यातील पावणेतीन तोळे वजनाची सोन्याची चेन नजर चुकवून चोरून नेल्याची घटना शहरातील माळीवाडा बसस्थानक येथे १९ मार्च रोजी घडली.

याबाबत सयाजी लाकडे (वय ६९, रा. वैदुवाडी, भोलेनाथ मंदिराजवळ, हडपसर, पुणे) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी लाकडे हे सालाबाद प्रमाणे पुणे येथून पाथर्डी तालुक्यातील मढी येथे दर्शनाकरिता आले असता ते माळीवाडा बसस्थानक येथे आले व तेथून मढी येथे जाणाऱ्या एसटी बसमध्ये बसण्यासाठी आत प्रवेश करीत असताना प्रवाशांच्या झालेल्या गर्दीत कोणीतरी अज्ञात चोरट्याने नजर चुकवून त्यांच्या गळ्यातील पावणेतीन तोळे वजनाची सोन्याची चैन चोरुन काढून घेतली. लाकडे हे एसटी बसमध्ये आत गेल्यानंतर त्यांच्या गळ्यातील चेन नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने बसमध्ये असलेल्या महिला कंडक्टरला याबाबत सांगितले. त्यानंतर या प्रकरणी ते तक्रार देण्याकरिता कोतवाली पोलीस ठाण्यात गेले.


याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी सयाजी लाकडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### कुसुमबाई पालवे यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - न्यु बेथेल कॉलनी, कोठी रोड येथील रहिवासी कुसुमबाई सुनील पालवे (वय ६८) यांचे १२ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. सिध्दार्थनगर येथील ख्रिश्चन कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला.



सुमित मधुकर पारधे यांच्या पत्नी होत. मार्टीन, मोरीस, मेबल पारधे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

हनुमान चालिसा पाठ

रविवार दि. २३/०३/२०२५
रात्री ८.३० ते १०.३०

श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर
प्रतापगड युवा प्रतिष्ठाण/वर्चस्व ग्रुप, गोविंद गॅरेज जवळ, वंजारगल्ली, सागरभाऊ मुर्तडकर मो.८०५५५४८५४७ सचिन दिवटे मो. ९८९००६००२३

मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एमआयडीसी, अहिल्यानगर
वैष्णव मित्र मंडळ, शिव पंचायतन मंदिर, बुरुडगाव रोड, फुलसौंदर मळा, श्री. भगवानशेठ फुलसौंदर मो.९०९६०६१००१

श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर, नवीपेठ
स्वराज युवा प्रतिष्ठाण, सागर कॉम्प्लेक्स, स्विट कॉर्नर चौक, आगरकरमळा, स्टेशन रोड

श्री संकटमोचन हनुमान सत्संग मंडळ, अहिल्यानगर
श्री. बालकिसन गंगाबिसन ओझा, भारत बेकरी समोर, साईराज नगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर



हनुमान चालिसा पाठ

सोमवार दि. २४/०३/२०२५
रात्री ८.३० ते १०.३०

श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर
स्वामी विवेकानंद मित्र मंडळ, स्वामी विवेकानंद चौक, शनि गल्ली, नरेंद्र कुलकर्णी मो.९८२२७७११९९

मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एमआयडीसी, अहिल्यानगर
मा.आ.अरुण काका जगताप मित्र मंडळ, आ. संग्राम जगताप यांचे कार्यालय, स्टेशन रोड, सक्कर चौक, श्री. मनिष फुलडहाळे मो.७०२०६२०१९२

श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर, नवीपेठ
सातभाई गल्ली गणेश मित्र मंडळ, दिक्षित मंगल कार्यालयाच्या समोर, दिल्ली गेट

श्री संकटमोचन हनुमान सत्संग मंडळ, अहिल्यानगर
श्री रामदेवरा मंदिर, श्री. राजेंद्र सोनी, चिपाडे मळा, सारसनगर, अहिल्यानगर


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# नगर शहर परिसरातून एकाच दिवशी तीन अल्पवयीन मुली झाल्या बेपत्ता

### कोतवाली, तोफखाना व नगर तालुका पोलीस ठाण्यात वेगवेगळे गुन्हे दाखल

नगर - नगर शहर परिसरातून २० मार्च रोजी एकाच दिवशी ३ अल्पवयीन मुलींचे अपहरण झाल्याच्या घटना केडगाव, तपोवन रोड, नगर तालुक्यातील तांदळी वडगाव या ठिकाणी घडल्या आहेत. या प्रकरणी कोतवाली, तोफखाना व नगर तालुका पोलीस ठाण्यात वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत केडगाव उपनगरात राहणारी अल्पवयीन मुलगी (वय १७) २० मार्चला दुपारी दोन ते तीन वाजेच्या दरम्यान आपल्या राहत्या घरातून बेपत्ता झाली आहे. घरात एकटी असताना ती अचानक गायब झाली असून, तिच्या कुटुंबीयांनी सर्वत्र शोधाशोध केली, मात्र अद्याप तिचा कुठलाही थांगपत्ता लागलेला नाही. तिच्या बहिणीने दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घरातील काही कारणावरून आई आणि मुलीचा किरकोळ वाद झाला होता. त्यानंतर फिर्यादी आणि आई दोघी बँकेत कामानिमित्त गेल्या असता मुलगी घरी एकटीच होती. मात्र परत आल्यानंतर ती घरात दिसली नाही. तसेच हॉलमधील एका कोपर्यात मी घर सोडून जात आहे असा मजकूर लिहिलेली चिट्ठी आढळून आली. मुलीचे अपहरण केल्याचा संशय फिर्यादीतून व्यक्त करण्यात आला असून पोलीस मुलीचा शोध घेत आहेत.

दुसऱ्या घटनेत नगर तालुक्यातील तांदळी वडगाव शिवारात राहणारी अल्पवयीन मुलगी (वय १६) तिच्या घरी असताना तिला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याच्या संशय तिच्या आईने व्यक्त केला आहे. तशी फिर्याद त्यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. गुरूवारी पहाटे दोनच्या सुमारास ही घटना घडली आहे. तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे हे मुलीचा शोध घेत आहेत.

तिसरी घटना नगर शहरातील तपोवन रोडवर घडली आहे. या ठिकाणाहून एक १७ वर्षीय मुलगी कपड्याची बॅग घेऊन २० मार्च रोजी रात्री ९ च्या सुमारास घराच्या कंपाऊंडचे पाठीमागील बाजूचे भिंतीवरून उडी मारून कुठेतरी निघून गेली आहे. तिला कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरीता फूस लावून पळून नेले असल्याचा संशय तिच्या आईने व्यक्त केला आहे. तसेच यापूर्वी डिसेंबर २०२४ मध्येही या मुलीस कुणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळून नेले होते. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असता तेव्हा ती मिळून आली होती. आता पुन्हा ती गायब झाल्याने तिच्या आईने दिलेल्या फिर्यादी वरून तोफखाना पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

# बँकेच्या कर्जाचा बोजा असल्याचे लपवून ठेवत गाळ्याची केली विक्री

### महिलेची ९ लाख ४० हजारांची फसवणूक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

नगर - दुकानाची विक्री करताना त्या दुकानावर आधीच बँकेचे कर्ज असल्याची माहिती लपवून ठेवली. त्यातून एका महिलेची ९ लाख ४० हजार रूपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सोमनाथ बाळासाहेब सुडके (रा. सुडके मळा, बालिकाश्रम रस्ता, अहिल्यानगर) याच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अनुराधा प्रशांत भोर (वय ३८, रा. तुळजाभवानी मंदिरामागे, सावेडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी २ फेब्रुवारी २०१८ रोजी सोम नाथ सुडके याच्याकडून नालेगाव हद्दीतील गट नं. २८२/४/अ/२८३/२/५/६-अ/६-ब येथील प्लॉट क्रमांक ०१आणि त्यावरील दुकान (गाळा) (क्षेत्रफळ १३.९२ चौ. मी.) खरेदी केले. त्या वेळी सोमनाथने सदर मिळकतीवर कोणतेही आर्थिक बोजा नसल्याचे सांगितले. सर्व कागदपत्रे तपासून त्यांनी खरेदी केली आणि दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदी दस्त नोंदणी करून घेतली. ही मालमत्ता खरेदी केल्यानंतर फिर्यादी यांनी नालेगाव तलाठी कार्यालयात जाऊन नाव लागले आहे का, याची खातरजमा केली होती.

मात्र, त्यानंतर त्यांनी अधिक चौकशी केली नाही. मात्र, १६ जुलै २०२४ रोजी डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे अधिकारी पंचनामा करण्यासाठी गाळ्यावर आले असता हा प्रकार उघडकीस आला. बँकेच्या अधिकार्यांकडून समजले की, सदर दुकानावर ९ लाख ४० हजार रूपयांचे कर्ज आहे. या माहितीने भोर यांना धक्का बसला. यानंतर त्यांनी पुन्हा तलाठी कार्यालयात जाऊन २३ जुलै २०२४ रोजी मिळकतीचा उतारा काढला. उतार्यात डोंबिवली बँकेच्या कर्जाचा बोजा असल्याचे स्पष्ट झाले.

सोमनाथ सुडके याने सदर मिळकत विक्री करताना कर्जाविषयी कोणतीही माहिती दिली नव्हती. खरेदी करताना सदर गाळा बोजामुक्त असल्याचे सांगून खोटी माहिती देण्यात आली. त्यामुळे भोर यांची फसवणूक झाली. या फसवणुकीच्या प्रकरणी भोर यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात अर्ज दिला. प्राथमिक चौकशीत फसवणुकीचा प्रकार स्पष्ट झाल्याने त्यांना तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यास सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी फिर्याद दिली असून या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे करत आहेत.



### भिंगारमध्ये बस फसली गटारात

भिंगार शहरातून जाणारा कल्याण विशाखापट्टणम् राष्ट्रीय महामार्ग अतिशय अरुंद असून या रस्त्याच्या कडेलाच गटार आहे. या अरुंद रस्त्यामुळे एसटी महामंडळाची एक बस गटारात फसलेल्याची घटना घडली आहे. अशा घटना वारंवार घडत असल्याने या अरुंद रस्त्याचे तातडीने रुंदीकरण करण्याची मागणी काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष सागर चाबुकस्वार यांनी केली आहे.

# घरातून लॅपटॉप व घड्याळाची चोरी

नगर - घराच्या उघड्या दरवाज्यातून आत प्रवेश करुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरातील २० हजार रुपये किमतीचे पल कंपनीचे घड्याळ, आणि एक लाख ४० हजार रुपये किमतीचा एप्पल मॅकबुक प्रो १४ इंची लॅपटॉप असा १ लाख ६० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. ही घटना मुकुंदनगर येथील वाबळे कॉलनी येथे २१ मार्च रोजी सकाळी सहा ते दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत ताहीर रफिक शेख (वय ३०, रा. वाबळे कॉलनी, मुकुंदनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे की कोणीतरी अज्ञात चोरट्याने सकाळी सहा ते दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान उघड्या घरातून आत प्रवेश करून घरातील घड्याळ व लॅपटॉप असा एक लाख साठ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी ताहेर शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### कॉफी पिणे धोकादायक

अनेक लोकांना जेवताना किंवा जेवण्याच्या आधी किंवा नंतर कॉफी पिण्याची सवय असते. असे करणे नुकसान कारत ठरते कारण याने शरीरात आयरनचे शोषण बाधित होत. आपण ॲनिमिक असाल तर हे अधिक आवश्यक होऊन जाते.

## पाककला

### बासमती शृंगार

**साहित्य :** २ वाट्या बासमती तांदूळ, १ वाटी खवा, ३ मोठे चमचे साजूक तूप, ३ वाट्या साखर, अर्धी वाटी काजू-बदाम काप पाव चमचा बेदाणे, १ चमचा वेलदोडा पूड, पाव चमचा केशर (दुधात भिजवून), १ मोठा चमचा गुलाबपाणी (इसेन्स नव्हे) आणि थोड्या गुलाबपाकळ्या.

**कृति :** तांदूळ स्वच्छ धुवून निथळावे. तांदळाच्या दुप्पट पाणी घेऊन ते उकळून त्यात मोकळा सळसळीत भात शिजवावा आणि परातीत पसरून गार होऊ द्यावा. साखरेचा तीनतारी पाक करून त्यात खवा, केशर वेलदोडा पूड घालावी. जाड बुडाच्या भांड्यात तूप तापवून काजू-बदाम-बेदाणे परतून त्यावर भात घालावा. साखरेचा पाक, गुलाबपाणी घालून सगळं अलगद मिसळावं. मंद आचेवर तवा ठेवून त्यावर भांड ठेवावं. घट्ट झाकण ठेवून पाक जिरून वाफ येऊ द्यावी. वाढताना भाताच्या मुदी पाडून वर गुलाबपाकळी लावावी.

## सल्ला

### स्मरण-बुद्धीसाठी घरगुती उपाय

खरबुजाच्या बिया शुद्ध तुपात भाजून कवच काढून खाव्यात. बुद्धी प्रगल्भ होते.

## वास्तू

स्टोव्ह, चूल शेगडीजवळ पाण्याचा हंडा वा सिंक ठेवू नये. घरात भांडणे होतात.

## सौंदर्य

* चेहऱ्याचा तेलकटपणा जाण्यासाठी ज्येष्ठमध पूड पाण्यात कालवून रात्री लावावी.

* मेथीची पाने वाटून केसांना लावल्यास व मेथ्या अर्धा-अर्धा चमचा सकाळ-सायंकाळ खाल्ल्यास केस गळणे बंद होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २३ मार्च २०२५

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, फाल्गुन कृष्णपक्ष, पू.षा. २८।१८, सूर्योदय ०६ वा. ३५ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आर्थिक विषयांमध्ये आपले प्रयत्न आपणास यश मि ळण्याचे कारण ठरतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल.

**वृषभ :** कला क्षेत्रात यश मिळण्याची शक्यता आहे. आपणास नवे वाहन मिळण्याची शक्यता आहे. मानसन्मानात वाढ होईल.

**मिथुन :** एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीची भेट आपल्यासाठी आनंदाची ठरेल. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. वाहने व उपकरणे जपून वापरावीत.

**कर्क :** आज आपणास कठोर श्रम करावे लागतील. काही निष्कारण चिंतांमुळे आपली व्यग्रता वाढेल.

**सिंह :** आपला जोडीदार आपणास भावनात्मक पाठबळ देईल. मित्रांमध्ये होणारे वाद आपल्या संबंधासाठी वाईट ठरतील.

**कन्या :** मानसिक स्थिती आल्हाददायक राहील व वरिष्ठांबरोबर संपर्कात आल्याने प्रसन्न वातावरण राहील. संततीसौख्य लाभेल.

**तूळ :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. आरोग्याची काळजी घ्या. व्यस्त राहाल.

**वृश्चिक :** इतर लोकांना आपल्या स्वतःच्या आवश्यकता व इच्छा सांगण्यासाठी ही उत्तम वेळ आहे.

**धनु :** कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील.

**मकर :** आपल्या जुन्या लोकांबरोबर किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे या वेळी आपल्यासाठी फलदायी ठरेल.

**कुंभ :** एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न कराल. यशस्वी व्हाल.

**मीन :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

### 'प्रश्न'


प्रवासी : (कन्डक्टरला) काहो बसमध्ये मी विडी पिऊ शकतो का?
कन्डक्टर : नाही साहेब
प्रवासी : काहो! या बसमध्ये विडीचे तुकडे कसे पडलेत!
कन्डक्टर : ते त्या लोकांचे आहेत की, ज्यांनी आपल्यासारखे मला प्रश्न विचारले नाहीत!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताचे ५० वे सरन्यायाधिश म्हणून कोणी ९ नोव्हेंबर २०२२ रोजी शपथ घेतली?
– न्या. धनंजय चंद्रचूड

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१३९ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१३८ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) एक आश्चर्यकारक शब्द २) मुक्त; फ्री; स्वतंत्र ३) सुईद्वारे शरीरात सोडले जाणारे औषध ४) लग्न झालेल्या मुलीचे सासू-सासऱ्याचे घर ५) रुपे; चांदी; सिल्व्हर ७) गोष्ट; कथा ९) असावधनता; हलगर्जीपणा; चूक ११) जीवित; आयुष्य; उमर; पाणी १३) राजस्थानातील एक भाग जेथील लोक व्यापारासाठी प्रसिद्ध आहेत १४) सुवर्ण; कांचन; सोने १६) आकाश; गगन; अंबर १८) लहान मूल २१) वाईट सवय; खोड

**उभे शब्द :-** १) ज्याचे मोल करता येत नाही असा ४) रत्नाकर; समुद्र ६) ताप येण्यापूर्वीची स्थिती ८) एक पक्षी; बक १०) पराजय आणि जय १२) पोते १३) स्वामी; नवरा; पती १५) तोंड; वदन १७) प्रवाहाचे आणलेले पाणी १९) ओढा; रोख; झोक २०) अखंड; न तुटता २२) झाकण असलेले भांडे २३) श्रम; मेहनत २४) पिकात वाढणारे अनावश्यक गवत

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** लोक निंदा करोत अगर प्रशंसा; धैर्यशाली पुरुष स्वतःच्या मार्गावरून विचलित होत नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मेलेला माणूस काही काळाने उठून बसला असे होते का?

एखाद्या चित्रपटात शोभेल अशी घटना! मृत व्यक्तीला तिरडीवर ठेवताच ती व्यक्ती उठून बसते. सगळ्या नातेवाईकांची धावपळ उडते. मग कळते की, ती व्यक्ती खरोखर मेलीच नव्हती.

हृदयाचे ठोके बंद पडले व श्वसन बंद पडले. तरीही काही सेकंदापासून काही मिनिटापर्यंत व्यक्ती जिवंत राहू शकते. या अवस्थेला 'सस्पेंडेड ॲनिमेशन' किंवा 'तात्पुरती मृतावस्था' असे म्हणता येईल. ही अवस्था योगी-ध्यानधारणा करणारे लोक स्वतःच्या इच्छेने आणू शकतात; पण मेंदूचे रोग, दुखापती, बधिरीकरणानंतर, विजेचा धक्का वा उष्णता, बार्बीट्यूरेट वा अफूची अधिक मात्रा घेतल्याने बेशुद्धावस्थेत गेलेल्या व्यक्तींमध्ये सस्पेंडेड ॲनिमेशन ही अवस्था आढळून येते.

त्यामुळेच मृत्यूचे निदान करताना ते फार काळजीपूर्वक करावे लागते. हृदयाचे ठोके स्टेथास्कोपने तपासून, तसेच श्वसनाची क्रिया होते का हे तपासून, पुरेसा वेळ गेल्यानंतर तज्ज्ञ डॉक्टर व्यक्तीला मृत घोषित करतात. मेंदूच्या कार्याचा विद्युत आलेख घेण्याची सोय असल्यास तो घेतात.

५ मिनिटे मेंदूच्या पेशींनी कोणत्याच प्रकारच्या कार्याचे प्रदर्शन आलेखात न केल्यास (हा आलेख म्हणजे केवळ एक सरळ रेषाच येते) व्यक्ती मृत आहे, असे समजता येते. मेलेला माणूस पुन्हा जिवंत होत नाही, हे मात्र लक्षात ठेवा. सस्पेंडेड ॲनिमेशन मधील माणूस पुन्हा जिवंत होतो, कारण तो खरोखर मेलेलाच नसतो. नाहीतर तुम्हाला वाटेल की, ती व्यक्ती नसून भूतच आहे. जगात भूत नसते, हे पक्के लक्षात ठेवा म्हणजे झाले!

### बढाई अंगाशी आली

एका गावातील एक माणूस बरीच वर्षे प्रवासाला गेला होता. अनेक ठिकाणी प्रवास करून तो आपल्या गावी परतला. आपण प्रवासात किती गमती-जमती, किती मौज-मजा पाहिल्या, ते तिखट-मीठ लावून तो आपल्या शेजारी लोकांना, भेटे त्याला सांगू लागला. एकदा तर त्याने एक लोणकढी थाप ठोकून दिली. म्हणाला,


''मी करणावतीला गेलो असता तेथील माणसे चांगली पंधरा-सोळा हात उंच उड्या मारीत असलेली पाहून मला मोठे नवल वाटले. मग त्यांनी अशी उंच उडी मारण्याची पैज माझ्याशीच लावली. तेव्हा मी इतकी उंच उडी मारली की, त्यांच्यापैकी कोणालाही माझी बरोबरी करता आली नाही.'' ऐकणारी माणसे मनात म्हणत, काय थापाड्या आहे!

उघडपणे कोणीही त्याचे म्हणणे मान्य करीत नसे; म्हणून तो वेगवेगळ्या शपथा घेऊन लोकांची खात्री पटवायचा प्रयत्न करीत असे. एकदा असाच तो अशी थाप जमलेल्या लोकांसमोर मारू लागला असता घोळक्यातील एक माणूस उठला आणि म्हणाला,

''अरे, अशा शपथा कशाला घेतोस? त्यापेक्षा तशीच उडी येथे मारून दाखव ना!'' हे ऐकताच तो बढाईखोर माणूस गप्प बसला आणि त्याने तेथून काढता पाय घेतला.

**तात्पर्य :** आपण पाहिलेल्या काही घटना फुगवून सांगण्याची काही लोकांना सवय असते; पण कधी-कधी त्यांची फजितीही होते.

## रहमते दर्शन (भाग - १)



अब १०७ रु. हो गये। मेरी लड़की बहुत दिनों से बीमार थी और किसी भी दवाई का असर उस पर नहीं हो रहा था। जब घर से चलने लगा, तो घरवालों को बता दिया कि मैं लड़की को एक भक्त के पास इलाज के लिए ले जा रहा हूँ और वहीं इसका इलाज कराऊँगा । लड़की को अजीब सी बीमारी थी। वह सोते समय चारपाई के उड़ने की शिकायत करती थी। मेरे एक और साथी थे। मैंने उन्हें भी महाराज जी के पास चलने को कहा। उनके लड़के पर कत्ल का एक झूठा केस चल रहा था। उसी दिन उसकी तारीख भी थी। उन्होंने तारीख के कारण जाने में अपनी असमर्थता जाहिर की। लेकिन थोड़ी देर में वे मेरे पास आये और बोले, तो होगा देखा जायेगा, चलो आश्रम में चलते हैं। अब हम चार आदमी आश्रम में जाने वाले थे। चारों के ध्येय अलग-अलग थे १. मेरा ध्येय नाम लेना था।

### वे एक सच्चे मित्र थे

२. मेरे बहनोई का ध्येय अन्तरीय अनुभव प्राप्त करना था। ३. मेरी बेटी अपनी बीमारी से मुक्ति चाहती थी । ४. मेरा मित्र अपने लड़के पर लगे झूठे इल्ज़ाम से मुक्ति चाहता था।

चारों को महाराज जी से नामदान मिल गया और सबकी इच्छाये पूरी हो गई थीं। मैंने सभी कामों के लिए अपने पास से पैसे खर्च किये यानी किराया वगैरह-वगैरह । जब घर वापिस लौटा तो मेरे पास अब ६ रु. बाकी बचे थे जो मेरे अपने ही पैसे थे।

दूसरी घटना इसी लड़की की शादी की है। मैंने शादी के लिए महाराज दर्शनसिंह जी से आशीर्वाद माँगा ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### धर्म गलानी

जिन बच्चों पर मां बाप ध्यान देते हैं वह खूब आगे बढ़ते हैं। अगर मां बाप ध्यान नहीं देते हैं तो बच्चे जीवन में पिछड़ जाते हैं। जो बहिनें घर की तरफ ध्यान देती हैं तो उन के घर चमकते रहते हैं। जिन घरों की तरफ ध्यान नहीं दिया जाता वह गंदगी से भरे रहते हैं और जल्दी ही टूट फूट जाते हैं। जिस क्षेत्र पर राजा की नजर पड़ती है वह खुशहाल बन जाता है। जिस क्षेत्र पर राजा ध्यान नहीं देता वह उजड़ जाता है। जिन आत्माओं पर भगवान ध्यान देता है वह महान बन जाती हैं। व्यक्तिगत जीवन में हम जिन क्षेत्रों पर ध्यान देते हैं उस क्षेत्र में विकसित हो जाते हैं। जिन पर ध्यान नहीं देता उन क्षेत्रों में पिछड़ जाते हैं। जो लोग आप पर निर्भर हैं या आप से छोटे हैं या जिनके आप लीडर हो उन के प्रति मन से हर रोज एक बार भगवान की याद में शुभ कामना जरूर भेजनी है। ऐसे ही। विश्व की सभी आत्माओं को मानसिक छत्रछाया में रखना है। उनके प्रति शुभ सोचते रहो। आओ आज एक नई शुरुआत करें। अपनी शक्ल को कल्पना में देखो। कल्पना में ही अपनी शक्ल और अपने बीच में बाबा को देखो और कहते रहो बाबा आप प्यार के सागर हैं। इस विधि से आप का दिमाग आप के शरीर का पुनर्निर्माण कर देगा।

इसी ढंग से सारे विश्व की आत्माओं को तरंगे देते रहो। आप की तरंगे सारे विश्व को पहुंचेगी और संसार बदलने लगेगा। आप जैसा चाहते हैं कैसा ही संसार बनेगा। आप की ये शुद्ध इमोशंस छत्रछाया का काम करेंगी।

थपकी का अर्थ है हल्का स्पर्श या सहलाना । जन्म से लेकर मृत्यु तक थपकी लेने की भावना बनी रहती है। कभी शांत नहीं होती। गर्भ में बच्चे को मां का शारीरिक स्पर्श मिलता रहता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'प्रॅक्टिकल नॉलेज...'

यशस्वी, सुखी, समाधानी होण्यासाठी विचार करणं गरजेचं आहे. विचार केव्हा करता येईल ? जेव्हा आपण शिक्षण घेऊ, ज्ञान मिळवू. शिकण्याची, ज्ञान मिळविण्याची मनापासून इच्छा पाहिजेच. शाळा, महाविद्यालयात मला, तुम्हाला ज्ञान हे थिअरी स्वरुपात अधिक असतं. हे ज्ञान प्रचंड गरजेचं आहे. तसेच ह्या ज्ञानाचा उपयोग आपण कधी ? कसा ? का करतो ? का केला पाहिजे ? का नाही केला पाहिजे ? हे समजणं अत्यंत महत्वाचं आहे. बँकेत खाते उघडुन आपण बचत करु शकतो हे मी शिकलो आहे. परंतु ह्या शिकलेल्या वाक्याची अनुभुती तेव्हाच येईल जेव्हा मी बँकेत जाईल, बचत खाते उघडण्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे? हे बँकेत जाऊन विचारलं पाहिजे. समजा ही सर्व कागदपत्र घेऊन मी बँकेत गेलो तर खाते उघडण्यासाठीचा फॉर्म भरणसुध्दा महत्वाचं आहे. बचतखात्याचे नियम बँकेतील संबंधित कर्मचाऱ्याला विचारले पाहिजेत. त्या नियमांची अंमलबजावणी केलीच पाहिजे. खातं उघडल्यानंतर जे पासबुक मिळालं त्यात, खात्यात जमा केलेली रक्कम व खात्यामधुन काढलेली रक्कम कुठं असते ? हे पाहिलं पाहिजे. माझ्या बचत खात्यात, रोख रक्कम जमा करावयाची असेल अथवा धनादेश जमा करावयाला असेल तर आवश्यक ती स्लिप भरली पाहिजेत. त्या स्लिपमध्ये काय - काय लिहायचं आहे हे सुध्दा पाहुन लिहिलं पाहिजे. तसेच त्या बँकेत आणखी कोण-कोणते विभाग आहेत ? तेथे नेमकं काय काम केलं जातं ह्याविषयीची माहिती घेतलीच पाहिजे. हे झालं प्रॅक्टिकल नॉलेज. आपण घेतलेल्या ज्ञानाचा अगदी योग्य उपयोग अर्थात प्रॅक्टिकल नॉलेज असं म्हणता येईल. थिअरॉटिकल नॉलेज हा पाया आहे असं आपण समजलो तर प्रॅक्टिकल नॉलेज हा कळस आहे असं म्हणता येईल. प्रॅक्टिकल नॉलेजकरिता सर्वात महत्वाचं म्हणजे इच्छा, आत्मविश्वास, नवं काही करण्याची जिद्द महत्वाची आहेच शिवाय हार न मानण्याची तयारी असायलाच हवी आहे.

थॉमस अल्वा एडिसन ह्यांना बल्बचा शोध लावतांना शेकडो वेळा अपयश आलं पण त्यांनी प्रॅक्टीकल करणं सोडलं नाही. ही चिकाटी, जिद्द आपल्यात उतरणं प्रचंड गरजेचं आहे. एखादी कृती वारंवार करत राहिलं की त्या कृतीची सवय होऊन जाते. अर्थात ती कृती स्वतः सह इतरांच्या फायद्याची असायलाच पाहिजे. आपल्या जवळपास काहीजण असे असतात जे मिळालेल्या ज्ञानाचा, घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग करतांना फक्त स्वार्थच पाहतात. अगदी जवळच्यांचं,

रक्तनात्याच्या व्यक्तींचं नुकसान झालं तरी चालेल पण प्रॅक्टीकल नॉलेज फक्त स्वार्थासाठीच ही वृत्ती मोहात पाडणारी आहे. स्वार्थीपणाचा मोह इच्छा पूर्ण नक्कीच करणार पण समाधान मिळवुन देणार नाही, आनंदी ठेवणार नाही. हा असा पैसाही भरपूर मिळवुन देईल पण सुख मिळवुन देणार नाही. तुम्ही ध्यान करता का ? करत नसाल तर ध्यान करणं सुरु करा. ध्यान हे खऱ्या अर्थाने प्रॅक्टीकल नॉलेज आहे अनुभुती आहे. ध्यानाचे फायदे तुम्ही कितीही वेळा वाचले, लिहिले तरी सुध्दा उपयोग नाही. कारण प्रॅक्टीकल नॉलेज घेणं हा शिक्षणाचा खरा उद्देश आहे. विज्ञान शाखेत जे शिकतात त्यांना प्रॅक्टीकलचं महत्व विचारा. प्रॅक्टीकल नॉलेज आचरणात आणणं खूपच महत्वाचं आहे. खऱ्या गरजवंताला सहकार्य करायलाच हवं आहे हे मी शिकलो आहे पण मी जे शिकलो ते आचरणात आणत नसेल तर प्रॅक्टीकल नॉलेज मिळणार तरी कसं? माझ्या मनात अनेक सकारात्मक विचार येतात पण त्या सकारात्मक विचारानुसार मी कृती करत नसेल तर प्रॅक्टीकल नॉलेज मिळणारंच नाही. प्रॅक्टीकल नॉलेज मिळतं कोठुन ?

हा प्रश्न विचारला की तरच मिळविण्याची जी धडपड असेल त्यामुळेच प्रॅक्टीकल नॉलेज मिळेल. एकमेकांसोबत आपण व्यवहार करतो त्यामधुन प्रॅक्टीकल नॉलेज मिळतं. भवतालच्या व्यक्तिंकडुन प्रॅक्टीकल नॉलेज मिळतं. एखादी गृहिणी जेव्हा, एखादा नवीन पदार्थ करण्याचा प्रयत्न करते तेव्हा तिला प्रॅक्टीकल नॉलेज मिळतं. एखादी चुक झाली तर होऊ द्या पण प्रयत्न करणं सोडु नका हेच सुत्र प्रॅक्टीकल नॉलेज मिळवुन देतं. ध्यान करणं म्हणजे नेमकं काय ? पोहणं म्हणजे नेमकं काय ? आपल्याजवळचं गरजवंताला देणं म्हणजे नेमकं काय ? मनासारखं नाही घडलं तरी आनंदात जगणं म्हणजे नेमकं काय ? ह्यासाठी प्रॅक्टीकल नॉलेज गरजेचं आहे. प्रॅक्टीकल नॉलेजमुळंच आपण खऱ्या अर्थाने चांगला उपयोग करुन ध्येय साध्य करु शकतो. जगणं समृध्द करु शकतो.

(लेख क्र.५४२)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

**रुग्णानुभव १० :** मार्च २०१० मध्ये एक रुग्ण श्रीगोंद्यावरून वीर्य तपासणीचा रिपोर्ट घेऊन आले होते. शरीरामध्ये शुक्रजंतू (zospermia) तयारच होत नव्हते. अपत्यप्राप्तीची इच्छा मनात धरून ते आले होते. त्यांना बस्तीचिकित्सा केली. तसेच बस्तांड घृताचा उत्तरबस्ती सुरू केला. शिलजित कॅप्सुल,

### गर्भवतींसाठी आरोग्यवर्धक पाककृती

च्यवनप्राश, आयुर्वेदीय दिनचर्येचे पालन करण्यास सांगितले. पाच महिन्यानंतर त्यांच्यामध्ये शुक्रजंतूचे प्रमाण ७ मिलियन्स एवढे झाले. हे प्रमाण अत्यल्प होते. परंतु मी त्यांच्या पत्नीचा Ovulation Study करून स्त्रीबीज फुटल्यावर ख.ण.ख. (Intrauterine Insemination) केले.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# प्रीकास्ट काँक्रिट - बांधकामाची किफायतशीर दर्जेदार, पर्यावरणपुरक आणि जलद आधुनिक पद्धत








घर बांधणीसाठी योग्य सामग्री निवडणे हा एक महत्त्वाचा निर्णय असतो. पारंपरिक आर सी सी (Reinforced Cement Concrete) बांधकामासोबतच आता प्रीकास्ट काँक्रीट (Precast Concrete) ही अधिक लोकप्रिय आणि स्मार्ट निवड ठरत आहे. प्रीकास्ट काँक्रीट म्हणजे फॅक्टरीमध्ये तयार केलेले काँक्रीट घटक, जे थेट साइटवर नेऊन जोडले जातात. पारंपरिक ओतल्या जाणाऱ्या काँक्रीटच्या तुलनेत, प्रीकास्ट काँक्रीट ही अधिक प्रगत आणि आधुनिक पद्धत आहे, जी बांधकाम जलद करण्यासोबत खर्चात बचत आणि उत्कृष्ट गुणवत्ता प्रदान करते. या लेखामध्ये आपण जाणून घेऊया की, प्रीकास्ट काँक्रीट तुमच्या घरासाठी एक स्मार्ट निवड का आहे, कारण घर बांधताना तुम्हाला फक्त एकदाच योग्य संधी मिळते!

**प्रीकास्ट काँक्रीट म्हणजे काय?**

प्रीकास्ट काँक्रीट (Precast Concrete) म्हणजे फॅक्टरी किंवा नियंत्रित वातावरणात तयार केलेले काँक्रीट घटक, साइटवर नेऊन थेट बसवले जातात. पारंपरिक RCC (Reinforced Cement Concrete) बांधकामात काँक्रीट मिश्रण साइटवर ओतले जाते आणि तिथेच त्याचे क्युअरिंग आणि मजबुतीकरण केले जाते. पण प्रीकास्ट काँक्रीटमध्ये हे सर्व प्रक्रियात्मक काम आधीच फॅक्टरीमध्ये केले जाते आणि घटक तयार झाल्यावर ते प्रकल्पस्थळी फक्त बसवले जातात.

**प्रीकास्ट काँक्रीटचे प्रकार**

**१. प्रीकास्ट भिंती** (Wall Panels) – घर आणि इमारतींसाठी रेडीमेड भिंती.

**२. प्रीकास्ट स्लॅब्स** (Floor Slabs) – मजले बांधण्यासाठी तयार स्लॅब्स.

**३. प्रीकास्ट कॉलम आणि बीम्स** (Columns Beams) – मजबूत इमारतींसाठी रेडीमेड खांब आणि बीम्स.

**४. प्रीकास्ट जिने** (Staircases) – जिन्याचे तयार भाग, जे थेट बसवता येतात.

**५. प्रीकास्ट कंपाऊंड वॉल** (Boundary Walls) – जलद आणि मजबूत कुंपण भिंत.

**६. प्रीकास्ट गटार व पाइप्स** (Drains Pipes) – पाणी आणि सांडपाणी व्यवस्थेसाठी.

**७. प्रीकास्ट पुलाचे भाग** (Bridge Components) – पुलासाठी तयार भाग, जे वेगाने बसवता येतात.

**८. प्रीकास्ट रेल्वे स्लीपर** (Railway Sleepers) – रेल्वे ट्रॅकखाली बसवण्यासाठी मजबूत स्लॅब्स.

**९. प्रीकास्ट फूटपाथ ब्लॉक्स** (Paving Blocks) – रस्ते आणि फूटपाथसाठी ब्लॉक्स.

महत्वाचे म्हणजे प्रिकास्ट हे सर्व ठिकाणी आणि सर्व प्रकारच्या बांधकामासाठी योग्य आहे. प्रिकास्ट काँक्रीटचा वापर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, लॉजिस्टिक आणि सार्वजनिक इमारतींसह नागरी बांधकाम व लँडस्केपिंगसाठी केला जातो. हे मजबूत आणि आकर्षक असून, कमी व उच्च उंचीच्या इमारतींमध्ये वापरले जाते. तसेच, प्रिकास्ट काँक्रीट थंड, उष्ण हवामान आणि भूकंपप्रवण भागांमध्येही यशस्वीपणे वापरण्यात येत आहे. इमारत पूर्णपणे प्रिकास्ट असू शकते किंवा स्थानिक बांधकाम अटी, गरजा आणि संसाधनांनुसार अंशतः प्रिकास्ट पद्धतीचा अवलंब केला जाऊ शकतो. प्रिकास्ट काँक्रीट एकमेव बांधकाम साहित्य म्हणून वापरले जाऊ शकते किंवा स्टील व लाकडासोबत संयोग करून त्याची संमिश्र संरचनाही तयार केली जाऊ शकते.

**प्रिकास्ट काँक्रीट का निवडावे?**

**१. उत्कृष्ट मजबुती आणि टिकाऊपणा**

प्रिकास्ट काँक्रीट हे नियंत्रित वातावरणात तयार केल्यामुळे त्याचा दर्जा आणि मजबुती सातत्यपूर्ण राहते. पारंपरिक साइटवर तयार होणाऱ्या काँक्रीटच्या तुलनेत, प्रिकास्ट काँक्रीट अधिक मजबूत आणि उच्च प्रतीचे असते.

* **'आग प्रतिरोधक :** प्रिकास्ट काँक्रीटला आग लागत नाही आणि उच्च तापमानातही ते टिकून राहते.

* **ओलावा आणि पाण्याचा प्रभाव कमी :** ओलाव्यामुळे होणाऱ्या समस्यांना प्रिकास्ट काँक्रीट अधिक प्रतिरोधक असते, त्यामुळे पाणी शोषले जाण्याचा धोका कमी असतो.

* **'किटक आणि बुरशीपासून संरक्षण :** लाकूड किंवा इतर बांधकाम साहित्यांप्रमाणे प्रिकास्ट काँक्रीटला कीटक आणि बुरशीपासून धोका नसतो.

* **बदलत्या हवामानास तोंड देण्याची क्षमता :** प्रिकास्ट काँक्रीट हे कठीण हवामान, चक्रीवादळ, वादळे आणि भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींना चांगला प्रतिकार करू शकते.

**२. जलद बांधकाम प्रक्रिया**

पारंपरिक बांधकाम प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर मजूर लागतात, त्यासाठी साइटवर वेळ खर्च करावा लागतो, आणि हवामानामुळे अनेकदा कामाच्या गतीवर परिणाम होतो. परंतु, प्रिकास्ट काँक्रीटमध्ये हे घटक कारखान्यात तयार होतात आणि ते साइटवर थेट वापरता येतात.

* **कामाचा कालावधी कमी होतो :** पारंपरिक बांधकामाच्या तुलनेत प्रिकास्ट काँक्रीटमुळे ३०–५०% वेळ वाचतो.

* **हवामानाचा कोणताही परिणाम नाही :** पाऊस, थंडी किंवा उष्णतेमुळे होणारे विलंब टाळता येतात.

* **बांधकामाच्या ठिकाणी कमी मजूर लागतात :** यामुळे मजुरीवरील खर्च कमी होतो आणि साइट व्यवस्थापन सोपे होते.

**३. खर्चसाठी लाभदायक उपाय**

प्रिकास्ट काँक्रीट ही एक दीर्घकालीन किफायतशीर गुंतवणूक आहे.

* **कमी देखभाल खर्च :** पारंपरिक काँक्रीटपेक्षा ते जास्त काळ टिकते, त्यामुळे सतत दुरुस्तीची गरज पडत नाही.

* **साहित्याची बचत :** साइटवर काँक्रीट तयार करताना होणारी नासाडी टाळता येते, त्यामुळे कच्च्या मालाचा अपव्यय होत नाही.

* **मजुरीचा खर्च कमी :** साइटवर काम करणाऱ्या मजुरांची संख्या कमी लागते, त्यामुळे मजुरीवरील खर्च कमी होतो.

**४. आकर्षक आणि लवचिक डिझाइन**

प्रिकास्ट काँक्रीट हे फक्त मजबूतच नाही तर आकर्षक आणि सर्जनशील डिझाइन्ससाठीही उत्तम पर्याय आहे.

* **वेगवेगळ्या प्रकारचे पृष्ठभाग आणि पोत** : विविध टेक्स्चर्स, पॅटर्न आणि रंगांचा वापर करून प्रिकास्ट काँक्रीटला सुंदर स्वरूप देता येते.

* **अधिक एकरूप आणि एकसंध :** हाताने टाकलेल्या काँक्रीटच्या तुलनेत, प्रिकास्ट काँक्रीट अधिक गुळगुळीत आणि एकसंध दिसते.

* **कोणत्याही आकारात उपलब्ध** : ते इमारतीच्या भिंती, छताचे स्लॅब, स्तंभ, शिड्या आणि इतर घटकांमध्ये सहजपणे वापरता येते.

**५. पर्यावरणपूरक आणि शाश्वत पर्याय**

प्रिकास्ट काँक्रीट हे पर्यावरणासाठी हितकारक आहे कारण ते नैसर्गिक संसाधनांचा कमी वापर करते आणि कार्बन फूटप्रिंटही कमी करते.

* **बांधकामाच्या ठिकाणी कमी कचरा** : साइटवर काँक्रीट मिक्स करण्याची गरज नसल्याने टाकाऊ पदार्थांची निर्मिती कमी होते.

* **पुनर्वापर आणि पुनर्नवीनीकरण :** प्रिकास्ट काँक्रीटचे अवशेष पुन्हा वापरता येतात, त्यामुळे पर्यावरणाला कमी हानी होते.

* **ऊर्जेची बचत :** प्रिकास्ट संरचना उष्णता शोषून ठेवते आणि उन्हाळ्यात इमारत थंड ठेवते, परिणामी विजेच्या खर्चात बचत होते.

**६. उत्कृष्ट गुणवत्ता नियंत्रण**

पारंपरिक पद्धतीने साइटवर टाकलेल्या काँक्रीटमध्ये अनेक वेळा मिक्सिंगच्या चुका, श्रमदोष आणि हवामानाचे परिणाम दिसून येतात. मात्र, प्रिकास्ट काँक्रीट कारखान्यात पूर्णपणे नियंत्रित वातावरणात तयार होत असल्यामुळे त्याचा दर्जा उच्च असतो.

* **अचूक माप आणि प्रमाण :** प्रत्येक घटक अचूक मोल्डमध्ये तयार केल्यामुळे त्याचा आकार आणि मजबुती निश्चित असते.

* **फेरफार न करता थेट वापरण्यायोग्य** : घटक तयार होताच ते कोणत्याही अतिरिक्त प्रक्रियेची गरज न पडता सरळ साइटवर स्थापित करता येतात.

* **मजबूत आणि सुरक्षित बांधकाम** : कमी दोष आणि जास्त दर्जामुळे इमारतीची स्थिरता वाढते.

**७. साइटवरील अडथळे कमी**

पारंपरिक बांधकामामुळे साइटवर अनेक अडथळे निर्माण होतात. वाहतुकीला अडथळा निर्माण होतो, धूळ आणि आवाजाचे प्रदूषण वाढते, तसेच इमारत परिसरातील लोकांनाही याचा त्रास होतो.

* **वाहतूक आणि रहदारीस अडथळा कमी :** साइटवरील वाहनांची वर्दळ कमी होते, कारण सर्व घटक कारखान्यात तयार करून थेट बसवले जातात.

* **आवाजाचे आणि धुळीचे प्रदूषण कमी :** साइटवर काँक्रीट मिक्सिंग आणि कटरिंग प्रक्रियेची आवश्यकता नसल्यामुळे, आसपासच्या परिसरातील नागरिकांना त्रास होत नाही.

* **जलद आणि स्वच्छ बांधकाम** : प्रिकास्ट काँक्रीट वापरण्यामुळे साइट स्वच्छ राहते आणि बांधकामाच्या ठिकाणी अनावश्यक साहित्याचा ढीग लागत नाही.

**डिझाइनमध्ये आर्किटेक्चरल आणि स्ट्रक्चरल स्वातंत्र्य**

प्रिकास्ट काँक्रीट वापरल्याने आर्किटेक्ट आणि स्ट्रक्चरल अभियंत्यांना **अधिक डिझाइन स्वातंत्र्य आणि लवचिकता मिळते.** पारंपरिक बांधकामाच्या तुलनेत, **प्रिकास्ट घटक वेगवेगळ्या आकारात, पोतांमध्ये (Texture), आणि रंगांमध्ये तयार करता येतात,** ज्यामुळे ग्राहकपयोगी आकर्षक आणि मजबूत रचना सहज तयार करता येतात.

**१. गुंतागुंतीचे आणि सर्जनशील डिझाईनही सहज शक्य** :

* **वेगवेगळे आकार आणि पोत** : प्रिकास्ट काँक्रीट मोल्डिंग तंत्रज्ञानाने कोणत्याही प्रकारच्या आकारात आणि पृष्ठभागाच्या पोतामध्ये तयार करता येते.

* **वास्तुशिल्पीय सौंदर्य :** सजावटीचे फिनिश, 3D पॅटर्न, आणि पृष्ठभागावरील डिझाइन्स सहजपणे साध्य करता येतात.

* **कस्टमाइज्ड डिझाइन :** विविध ग्राहकांच्या आणि प्रकल्पांच्या गरजांनुसार प्रिकास्ट घटक सहजपणे मॉडिफाय करता येतात.

**२. मोठ्या स्पॅन आणि उघड्या जागा (Open Spaces) तयार करणे शक्य**

* **कमी कॉलम, अधिक मोकळी जागा :** मोठ्या स्पॅन (Large Span) तयार करता येतात, **त्यामुळे अधिक मोकळी आणि अडथळा – मुक्त जागा मिळते.**

* **कमीत कमी आधारभूत घटक :** कमी संख्या असलेले कॉलम आणि भिंती असतानाही मजबूत संरचना शक्य होते.

* **ऑडिटोरियम, मॉल्स, आणि मोठ्या व्यावसायिक जागांसाठी योग्य :** मोठे हॉल, गोदामे, आणि औद्योगिक इमारतींसाठी प्रिकास्ट काँक्रीट सर्वोत्तम आहे.

**३. स्ट्रक्चरल मजबुती आणि टिकाऊपणा कायम**

* **उच्च भारवाहक क्षमता :** प्रिकास्ट काँक्रीट **मोठ्या लोड्स सहन करू शकते,** त्यामुळे गगनचुंबी इमारतींसाठी उपयुक्त आहे.

* **बदलते हवामान आणि भूकंपाचा प्रभाव सहन करण्याची क्षमता :** योग्य रचना आणि सन्मिश्रण तंत्रज्ञानामुळे सुरक्षित आणि टिकाऊ इमारती उभारता येतात.

* **पूर्व-अभियांत्रिकीकरण (Pre-engineered) डिझाइन :** मजबूत सांधे आणि उच्च-गुणवत्तेच्या जोडणीमुळे **रचना अधिक सुरक्षित आणि टिकाऊ होते.**

**४. वेगवेगळ्या प्रकारच्या संरचनांसाठी अनुकूल**

* **गृहनिर्माण प्रकल्प** (Residential Buildings) – आधुनिक फ्लॅट आणि बंगल्यांसाठी प्रिकास्ट काँक्रीट वापरले जाते.

* **व्यावसायिक इमारती** (Commercial Spaces) – ऑफिसेस, मॉल्स, आणि औद्योगिक संकुलांसाठी अधिक लवचिक पर्याय उपलब्ध झाला आहे.

* **पायाभूत सुविधा** (Infrastructure Projects) – पूल, सबवे, फ्लायओव्हर, आणि स्टेडियमसाठी उच्च- गुणवत्तेच्या रचनांमध्ये प्रिकास्टचा वापर होत आहे.

**सारांश**

प्रीकास्ट काँक्रीट ही एक आधुनिक आणि अत्यंत कार्यक्षम बांधकाम पद्धत आहे. जी बांधकामास उत्कृष्ट मजबुती, टिकाऊपणा देते तसेच खर्चात बचत करून बांधकाम जलद पूर्ण करण्यास मदत करते. आग, ओलावा, हवामानातील बदल आणि कीटकांना तोंड देण्याची प्रीकास्ट काँक्रीटची क्षमता निवासी आणि व्यावसायिक इमारतींसाठी एक विश्वासार्ह पर्याय बनत आहे. याव्यतिरिक्त, प्रीकास्ट काँक्रीट पर्यावरणपूरक आहे. त्यामुळे बांधकाम कचरा आणि ऊर्जेचा वापर कमी होतो. लवचिक आणि ग्राहकांना सौंदर्यात्मकदृष्ट्या आकर्षक डिझाइनसाठी ते मुभाही देते. दीर्घकालीन फायदे लक्षात घेता, प्रीकास्ट काँक्रीट निवडणे एक हे कोणत्याही बांधकाम प्रकल्पासाठी एक स्मार्ट गुंतवणूक आहे.

**इंजि. वर्षा संदिप कुसळकर,** **M.E. (Structure ), B.E. (Civil), D.C.E**
**Structural Engineer, RCC Steel Design Consultant**
**VSK Consultancy**
**Krushna partment, Behind mit Service Station,**
**Near Ganesh Chowk, Bolhegoan**
**Road, Nagapur, hilyanagar - 414111**
**Contact: 9850192345/9011118787**
**Email: vskconsultant1@gmail.com**



आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर AESA www.aesanagar.com

# कल तपासणी - आधुनिक काळाची गरज

निसर्गात जसे वैविध्य आहे तसेच माणसातही आहे. प्रत्येकामध्ये कोणता ना कोणता तरी चांगला गुण असतोच. फक्त तो ओळखणे महत्वाचे. खरं तर कल तपासणी आपल्याकडे खूप पूर्वीपासून सुरु आहे. गुरु द्रोणाचार्यांनी अर्जुनच्या स्वभावाचे शांत, निग्रही, अचूक नियोजन करणारा असे गुण पाहून त्याला उत्तम धनुर्धारी बनवले, तर भीमाची ताकत राकटपणा असे गुण पाहून उत्तम गदाधारी बनवले. गुरु आपल्या शिष्याचा कल बघून त्याला कोणत्या क्षेत्रात तो यशस्वी होऊ शकतो हे सांगू शकत नाही.

तुमच्यातील जन्मजात कौशल्य जे सरावाने बहरू शकते. त्यालाच 'अभिक्षमता म्हणतात. कलतपासणी म्हणजे एखाद्या व्यक्तीला आवश्यक प्रशिक्षणामुळे विशिष्ट विषयात किती कौशल्य मिळवता येईल हे दाखवणारा गुण समुच्चय, ज्ञान संपादनासाठी आणि तुमच्या शिक्षण क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवण्यासाठी आणि बुद्धिमत्ता, स्वभाव, आवड, कौशल्ये यांचा समावेश करून निष्कर्ष काढता येतो.

काही आवडी आणि कौशल्ये जन्मजात असतात उदा. मंगेशकर घराणे यात सर्वच जण गायनकौशल्ये घेऊन आली आहेत. या जन्मजात कौशल्याला त्यांनी अपार मेहनतीची जोड दिल्यावर काय होऊ शकते ते आपण बघितले आहेच.

यशस्वी होण्यासाठी फक्त हुशार असून चालत नाही. बुध्यांक, भावनांक, प्रेरणा, कल, क्षमता, साध्य मिळवण्यासाठी जिद्द या सर्वच गोष्टी महत्वाच्या असतात. या सर्वांचे चाचणीद्वारे मापन होऊ शकते.

आपल्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण घेतल्याने लवकरच यश संपादन करता येते असे शास्त्रज्ञ म्हणतात. उच्च पदावर काहीजण पाच वर्षात पोहोचतात तर काहींना वीस वर्षे लागण्याचे कारण बहुदा तेच असते. त्यामुळे आवडीच्या क्षेत्रात काम मिळणे महत्वाचे; अर्थातच जिद्द, चिकाटी, मेहनत याशिवाय कोणतेच ध्येय साध्य होत नाही, समुपदेशक नेमके हेच काम करतात. या सर्व गोष्टींची सांगड घालून सर्व क्षमतांचा वापर करायला शिकवतात.

आजकालच्या स्पर्धात्मक युगात एकापेक्षा अनेक क्षेत्रांत मुख्य आणि पूरक असे अभ्यासक्रम पूर्ण केल्यास जास्त फायदेशीर ठरते. उदा. इंजिनिअरींग बरोबर व्यवस्थापनाची डिग्री व कॉम्पुटर अद्ययावत शिक्षण किंवा ट्रेव्हल टुरिझम बरोबर परदेशी / परप्रांतीय भाषा अथवा कॉम्पुटरचे शिक्षण.

कोणत्याही क्षेत्रात धडपड तर आवश्यक असतेच, परंतु त्या क्षेत्रातील संबंधित वेगवेगळ्या क्षेत्रांचा अभ्यास असेल तर अयशस्वी होण्याची शक्याता कमी असते वा नसते. बऱ्याचदा आई-वडिलांच्या पूर्ण न झालेल्या शैक्षणिक इच्छा ते मुलांकडून पूर्ण करून घेण्याचा प्रयत्न करतात. जर मुलांना स्वताची जाणीव नसेल तर त्यांचा निर्णय चुकू शकतो आणि शिक्षण, पैसा, वेळ वाया जाण्याची शक्यता असते. पालक सहसा शाखा निवडतांना आर्थिक सुरक्षितता, राजमान्यता, परम्परागत व्यवसाय अशा प्रकारे विचार करतात. मात्र यात ते मुलांच्या क्षमता त्या व्यवसायासाठी अनुरूप आहेत किंवा नाही हे समजून घेत नाहीत. करिअर म्हणजे काय तर आपल्या आवडत्या क्षेत्रात शिक्षण घेऊन त्यात उच्चपदावर जाणे प्रत्येक क्षेत्रात पहिल्या पाच जणांना वाव असतो त्यांना नेहमीच मागणी असते त्यामुळे कोणत्याही अभ्यासक्रमात विशेष प्राविण्य मिळविणे केव्हाही चांगलेच आणि त्यासाठी प्रयत्न करीत राहिले पाहिजे.

**– सौ. नेहा तांबोळी**
कलतपासणी तज्ञ चिरंजीव क्लिनिक

# समाजकार्य : मानवी पिढीला एकसंघ ठेवणारा व्यवसाय

नुकताच १८ मार्च २०२५ रोजी संपूर्ण जगामध्ये जागतिक समाज कार्य दिवस साजरा करण्यात आला. समाजातील वंचित, गरजू, दुर्लक्षित आणि समस्याग्रस्त लोकांसोबत काम करणाऱ्या व्यावसायिक समाज कार्यकर्त्यांच्या कार्याला सन्मानित करण्यासाठी हा दिवस दर वर्षी मार्च महिन्यातल्या तिसऱ्या मंगळवारी साजरा करण्यात येतो. प्रत्येक वर्षी एक विशिष्ट विषय (थीम) घेऊन व्यावसायिक समाज कार्यकर्ते समुदायामध्ये जनजागृती करत असतात. या वर्षी शास्वत विकासासाठी आंतरपिढीय ऐक्य बळकट करणे या विषयाच्या अनुषंगाने व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ते जगातील अनेक देशांमध्ये जनजागृती करत आहेत. भारतामध्येसुद्धा व्यावसायिक समाज कार्यकर्ते, समाज कार्याचे शिक्षण देणाऱ्या संस्था, आणि स्वयंसेवी संस्थामध्ये हा दिवस वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. परंतु बऱ्याच लोकांना या दिवसा विषयी किंबहुना व्यावसायिक समाज कार्याविषयी माहिती नसल्याने हा दिवस तितका प्रकाश झोतामध्ये आला नाही. या अनुषंगाने आपण व्यावसायिक सामाजकार्याविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.

भारतासारख्या विविधता असणाऱ्या राष्ट्रामध्ये ज्याला तथागत गौतमबुद्धांपासून महावीर, बसवण्णा, संततुकोबा, महात्मा फुले, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ते संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विनोबा भावे यांच्यापर्यंतचा सामाजिक कार्याचा वारसा आहे. याच प्रकारचे समाज घडविण्याचे आणि सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याचे कार्य हे व्यावसायिक समाज कार्याच्या माध्यमातून केले जाते. जगभरामध्ये समाजकार्य हा व्यवसाय असू शकतो, हे मान्य करत असतानाच काही प्रमाणामध्ये आपल्याकडे याला व्यवसाय म्हणून स्वीकारावयास आपण कमी पडतो. बऱ्याचदा समाज कार्य शिकणाऱ्या व ते शिक्षण घेतल्यानंतर प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यावसायिक समाज कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्याविषयी महत्व पटवून देण्यासाठी व सामाजिक कार्यकर्त्याची ओळख निर्माण करण्यासाठी संघर्ष करावा लागतोय. भारतासारख्या प्रगतीशील देश्यामध्ये अशिक्षित तर सोडाच परंतु शिक्षित लोकांमध्येसुद्धा व्यावसायिक समाज कार्याविषयी तितकी जागुरकता नसल्याचे दिसून येते. आपल्याकडे समाजकार्य म्हणजे फाउल्या वेळामध्ये केले जाणारे काम असा एक गैरसमज मोठ्या प्रमाणामध्ये दिसून येतो आणि म्हणून समाजकार्याच्या व्यावसायिकतेकडे तितके गांभीर्याने बघितले जात नाही.

व्यावसायिक समाज कार्य हे इतर व्यवसायाप्रमाणे तंत्रशुद्ध आणि कौशल्यपूर्ण पद्धतीने केले जाणारे कार्य आहे. ज्या प्रमाणे डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक होण्यासाठी अगोदर प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे त्याचप्रमाणे व्यावसायिक समाज कार्य कारणासाठी प्रशिक्षण घेणे गरजेचे असते. हे प्रशिक्षण १२ वी नंतर बी. एस. डब्लू. किंवा पदवीनंतर एम. एस. डब्लू. असे घेतले जाऊ शकते. या दोन वर्षांच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना मानवी समाजाचे आणि त्यांना येणाऱ्या समस्यांचे धडे शिकवून त्या समस्यांचे निराकरण कशा पद्धतीने करता येईल, याचे प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून त्यांना ज्ञान, कौशल्य व सामाजिक दृष्टीकोन विकसित केला जातो. भारतामध्ये जवळपास ५०० शैक्षणिक संस्थामधून समाजकार्याची पदवी व पदवीत्तर शिक्षण दिले जाते. अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये गेल्या ५० वर्षांपासून भास्कर पांडुरंग हिवाळे शिक्षण संस्थेच्या ग्रामीण विकास अध्ययन केंद्र- समाज कार्य व संशोधन संस्था (सीएसआरडी ) यांच्या माध्यमातून व्यावसायिक समाजकार्याचे शिक्षण देण्याचे कार्य अविरतपने चालू आहे. या संस्थेमध्ये पदवी (बी एस डब्लु ) व पदवीत्तर (एम एस डब्ल्यू) अशा दोन्ही स्तरावरचे शिक्षण प्रदान केले जाते. भारतातील ग्रामीण समाजकार्याची शिक्षण देणारी एक प्रचलित संस्था म्हणून सी. एस. आर. डी. चे नाव घेतले जाते. समाज कल्याण, आदिवासी विकास, महिला व बाल कल्याण, ग्रामीण विकासाच्या शासकीय व अशासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, कंपनीमधील CSR (सामाजिक बांधीलीकीचे प्रकल्प), शहरी भागातील प्रशासनामध्ये, शासकीय व इतर रुग्णालयामध्ये, शैक्षणिक संस्थामध्ये, आणि इतर मानवी सहवास असणाऱ्या ठिकाणी व्यावसायिक समाज कार्यकर्ते नोकरी करून आपली मोलाची भूमिका बजावत असतात. त्याचबरोबर या संस्थेतील काही विद्यार्थी परदेश्यामध्ये सुद्धा नोकरी करून त्या ठिकाणच्या सामाजिक समस्यांवर काम करत आहेत. यातून व्यावसायिक समाजकार्यकर्त्यांना अर्थार्जन तर होतेच परंतु आपल्या हातून समाजबांधणीचे कार्य होते याचेही समाधान त्यांना मिळते. व्यावसायिक समाज कार्याचे स्वरूप जरी काळानुरुप जरी बदलत गेले असले तरी त्याचे मूळ हे मानवतावादी विचारधारेवरच आधारित आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता, जलद इंटरनेट सेवा, आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे आज आपण अशक्य गोष्टीना शक्य करू शकतो. परंतु त्याचबरोबर अनेक सामजिक प्रश्न जसे कि, आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धे व त्यामधून निर्माण होणारे सामाजिक प्रश्न, वैश्विक हवामान बदलाचे परिणाम, पर्यावरणाचे प्रश्न, समाजिक संघर्ष, वाढती आर्थिक विषमता आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या, जात-धर्म-वंश लिंगभेद या आणि अशा अनेक उभरत्या सामाजिक प्रश्नांना हाताळण्यासाठी तंत्रशुद्ध ज्ञान, कौशल्य आणि सामाजिक जाणीव असणाऱ्या प्रशिक्षित कार्यकर्त्यांची नितांत गरज आहे. तंत्रज्ञानाच्या आधारे झपाट्याने बदलणाऱ्या जगामध्ये माणसांना माणसाशी जोडून ठेवण्याची नितांत गरज आहे. मानावाता आणि मानवी मूल्यांच्या आधारे आदर्श समाज घडविण्यासाठी आणि समाजामध्ये एकसंघता विकसित करण्यसाठी व्यावसायिक समाज कार्यकर्ते घडविणे हि काळाची गरज आहे.

**– डॉ. प्रदिप जारे**
**सहाय्यक प्राध्यापक,**
**सी. एस. आर डी–**
**समाजकार्य व संशोधन संस्था, अहमदनगर**

# आनंदऋषीजी हॉस्पिटलची एका छत्राखाली मिळणारी आरोग्यसेवा कल्पवृक्षाप्रमाणेच

### माणकचंद कटारिया यांचे प्रतिपादन, उच्च रक्तदाब व मधुमेह व इतर सर्व आजारांवर उपचार व तपासणी शिबिरास प्रतिसाद

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये येणारा रुग्णास दवा बरोबर दुवाही मिळते. आचार्य आनंदऋषीजींच्या आशीर्वादाने पावन झालेल्या हॉस्पिटलमध्ये येणारे रुग्ण बरे होऊन आनंदाने घरी जातात. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये हृदयरोग शस्त्रक्रिया, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, डायलेसिस, जनरल सर्जरी, दंत चिकित्सा अशा अनेक विविध प्रकारच्या आजारांसाठी हॉस्पिटलमध्ये उपचार केले जातात. आनंदऋषीजी हॉस्पिटलची एका छत्रा खाली मिळणारी आरोग्यसेवा कल्पवृक्षाप्रमाणेच आहे, असे प्रतिपादन हॉस्पिटलच्या स्थापनेपासून कार्यरत असलेले माणकचंद कटारिया यांनी केले आहे.


उच्च रक्तदाब, मधुमेह व इतर आजारांवर उपचार व तपासणी शिबीराचे उद्घाटन करतांना माणकचंद कटारिया. समवेत डॉ. मितेश कटारिया, डॉ. निखिता कटारिया, वैशालीताई मुथा, अभय मुथा, डॉ. प्रकाश कांकरिया, निखिलेंद्र लोढा, सतीश लोढा, सुभाष मुनोत, अभय गुगळे, डॉ. आशिष भंडारी आदी.

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा.यांच्या ३३ व्या पुण्यस्मृती दिना निमित्त उच्च रक्तदाब व मधुमेह व इतर सर्व आजारांवर उपचार व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन माणकचंद कटारिया व सज्जनबाई कटारिया यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी डॉ.मितेश कटारिया, डॉ. निखीता कटारिया, वैशालीताई मुथा, अभय मुथा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे सदस्य डॉ.प्रकाश कांकरिया, निखीलेंद्र लोढा, सतीश लोढा, सुभाष मुनोत, अभय गुगळे, प्रकाश छल्लाणी, डॉ.आशिष भंडारी तसेच शिबिराचे तज्ज्ञ डॉक्टर डॉ.वसंत कटारिया, डॉ. गजेंद्र गिरी, डॉ.रविराज गवळी, डॉ.प्राजक्ता पारधे आदी उपस्थित होते.

डॉ.निखीता कटारिया म्हणाले, या आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या शिबिराच्या माध्यमातून रुग्णांची सेवा घडत आहे. आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने व जैन सोशल फेडरेचशन यांच्या सहकार्याने खारीचा वाटा उचलण्याची संधी कटारिया परिवाराला मिळाली आहे.

प्रास्ताविकात डॉ.वसंत कटारिया म्हणाले, माणकचंद कटारिया हे आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या स्थापनेपासून आजपर्यंत जैन सोशल फेडरेशनचे कार्यक्षम सदस्य म्हणून कार्य करीत आहेत. तसेच तसेच डॉ.मितेश व डॉ. निखीता कटारिया हे देखील आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या रुग्णसेवेच्या कार्यात जोडले गेलेले आहेत. माणकचंद कटारिया व कटारिया कुटुंब तन–मन–धनाने निस्वार्थ सेवा करीत आहेत. समाजातील अशा दानशूर व्यक्तींमुळे अतिशय महागडी असणारी उपचार पद्धती सवलतीच्या दरात व मोफत देण्यासाठी मदत होत आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे मधुमेहाचे प्रमाण वाढले आहे. देशात पंधरा टक्के लोक वजन जास्त असल्यामुळे, मानसिक तणाव असल्यामुळे मधुमेहा चे बळी पडत आहे. मधुमेह होऊ नये. यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येकाने जीवन शैलीत बदल करुन योग्य तो आहार घेणे व व्यायाम करणे आवश्यक आहे.

डॉ.प्राजक्ता पारधे म्हणाले, मधुमेहाच्या रुग्णांनी डॉक्टरच्या सल्ल्याने औषधोपचार केल्यास रक्तातील साखरेवर नियंत्रण मिळवता येते. मधुमेह होऊ नये. यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक आहे. वयाच्या चाळीशी नंतर मधुमेह ची तपासणी करणे आवश्यक आहे. डॉ.आशिष भंडारी यांनी सुत्रसंचलन केले. स्वागत निखिलेंद्र लोढा यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले. उच्च रक्तदाब व मधुमेह व ईतर सर्व आजारांवर उपचार तपासणी शिबिरात २०१ रुग्णांची तपासणी करण्यात आली.



गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात सद्गुरु किसनगिरी विजय ग्रंथाचे पारायण करण्यात आले. याप्रसंगी भाविक उपस्थित होते.

## सद्गुरु किसनगिरी बाबा पुण्यतिथी सोहळा उत्साहात

### गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात महाप्रसादाचे वाटप

नगर – दत्तात्रय भगवान व समर्थ सद्गुरु किसनगिरी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व गुरुवर्य ह.भ.प. भास्करगिरीजी महाराज श्री क्षेत्र देवगड देवस्थान यांच्या प्रेरणेने पाईपलाईन रोड येथील संत किसनगीरीनगर येथे गुरुदत्त भक्तीधाम येथे सद्गुरु किसनगिरी बाबा यांची पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुदत्त भक्ती धाम मंदिरात सोहळ्याचे १२ वे वर्ष आहे.

गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. सकाळी ६ ते ८ या वेळेत भगवान दत्तात्रेय अभिषेक, नित्य, पूजा व आरती सकाळी ९ ते १२ या वेळेत श्री किसनगिरी विजय ग्रंथ पारायण करण्यात आले. दुपारी १२ वाजता सद्गुरु दत्तात्रयांची महाआरती करण्यात आली. महाआरती नंतर 'भाविकांसाठी महाप्रसादाचे (भंडारा) वाटप करण्यात आले. रात्री ९ ते ११ या वेळेत हभप गोरक्षनाथ दुतारे महाराज यांचा भजन संध्याचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास पाईपलाईन रोड, गुलमोहर रोड, सावेडी, नगर शहर, किसनगिरीनगर, वाणीनगर परिसरातील भाविक उपस्थित होते.

## आठरे पाटील पब्लिक स्कूलचा जलतरण तलाव सर्वांसाठी खुला

नगर – अहमदनगर शहराच्या सावेडी विभागातील वडगांव–गुप्ता रोडवरील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेच्या २५ एकर निसर्गरम्य, शांत, प्रसन्न व प्रदूषणमुक्त वातावरणात जलतरण प्रशिक्षणाचा आनंद घेण्यासाठी २० मार्च पासून जलतरण तलाव सकाळी ७ ते १२.०० व सायंकाळी ३ ते ६ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुला करण्यात आलेला आहे, तसेच पुरूष व महिलांसाठी स्वतंत्र बॅचेसमध्ये जलतरण सुविधा उपलब्ध राहील.

## अहिल्यानगरमध्ये २३ मार्चला 'ह्युंदाई अल्वेज अराउंड कॅम्प'

नगर – ह्युंदाई मोटर्स इंडिया कंपनीच्या माध्यमातून नगर–पुणे महामार्ग येथील इलाक्षी शोरुम आणि मनमाड रोड, सावेडी येथील सेंटरमध्ये ग्राहकांसाठी रविवारी (दि.२३ मार्च) ह्युंदाई अल्वेज अराउंड कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पचा लाभ घेण्याचे आवाहन शोरुमचे जनरल मॅनेजर राजू बेजगमवार यांनी केले आहे.



कॅम्पमध्ये नवीन गाडीच्या स्पॉट बुकिंगवर १० हजार रुपयापर्यंतची ॲक्सेसरीज मोफत (ऑल मॉडेल्स क्रेटा व्यतिरिक्त), फ्री कार परफ्युम, फ्री हेड कुशन्स, २० टक्के डिस्काउंट ऑन ॲक्सेसरीज, २० ते ३० टक्के पर्यंत डिस्काउंट ऑन इंटिरियर क्लीनिंग ॲण्ड बॉडी कोटिंग आणि विविध सवलतींचा लाभ दिला जाणार आहे.

ग्राहकांना शंभर टक्के समाधानी करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी सर्व्हिस बुकिंगसाठी ९११२२१५७६१ व ९१७२९२२३९२.

### कृतिशील सेवानिवृत्त शासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना व योग विद्या धाम यांच्यावतीने

## नगरमध्ये २३ मार्चला ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यशाळा

नगर – महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शासकीय कृतिशील अधिकारी कर्मचारी संघटना, पुणे, अहिल्यानगर जिल्हा शाखा आणि योग विद्या धाम, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने सेवानिवृत्त शासकीय कृतिशील अधिकारी, कर्मचारी व ज्येष्ठ नागरिकांसाठी २३ मार्च रोजी एक दिवशीय पहिलीच विनाशुल्क कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती संघटनेचे सहसचिव दिलीप थिटे, कोषाध्यक्ष नागेश बोल्ली व अध्यक्ष अभियंता मनोहर पोकळे यांनी दिली.

नगरमधील सावेडी भागातील गुलमोहोर रस्त्यावरील आनंद विद्यालय येथे ही कार्यशाळा होत आहे. २३ मार्च रोजी उपस्थितांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता होणार आहे. यावेळी न्यू आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेजचे किरण सुपेकर हे ११ ते १२.३० या वेळेत सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. योग विद्या धामचे दत्ता दिकोंडा व श्रीमती मीना देशपांडे यांचे आरोग्य व योगासंबंधी उपस्थितांना मार्गदर्शन होणार आहे.

दुपारच्या भोजन सुट्टीनंतर 'ज्येष्ठ नागरिकांचे धोरण' या विषयावर सेवानिवृत्त शासकीय कृतिशील अधिकारी व संघटनेचे अध्यक्ष अभियंता मनोहर पोकळे यांचे व्याख्यान दुपारी २.३० ते ५.३० या वेळेत आयोजित केले आहे. याचबरोबर केअर हेल्थ इन्शुरन्स कंपनीचे वरिष्ठ व्यवस्थापक राम भाऊसाहेब कडूस यांचे 'ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विम्यासंबंधात' मार्गदर्शन होणार आहे. ॲक्सीस मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनीचे सहाय्यक शाखा प्रबंधक राहुल रामदुर्गकर यांचे 'जीवन विम्याबाबत' मार्गदर्शन होईल.

वरील सर्व कार्यक्रम व व्याख्याने वेळेत पूर्ण होण्यासाठी कार्यशाळा सकाळी वेळेवरच सुरू होणार आहे. अधिक माहिती व नोंदणीसाठी सेवानिवृत्त शासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष सुनील पावले (मोबाईल ९८५०८३८५४६), सहसचिव दिलीप थिटे (९८८१६४४४०२), संघटक अभियंता सुनील गायकवाड (९८९०१३३३४१), संघटक सुधाकर रामदिन (८९९९२३२२६२), निमंत्रित अभियंता नूर आलम (९९७०३२२१४३), संघटक अशोकराज आहेर (९०९६०२५७१७), संघटक अभियंता ज्ञानदेव शिरसाठ (९८२२७५८८०६), सदस्य अभियंता प्रकाश अकोलकर (९४२१४३८९९९), संघटक श्रीमती लता तोरणे (८६०५४४८२२४) यांच्याशी संपर्क साधावा तसेच कार्यशाळेस उपस्थित राहावे.


भीमशक्तीची अहिल्यानगर शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

## भीमशक्तीची अहिल्यानगर शहर कार्यकारिणी जाहीर

नगर – अहिल्यानगर शहरातील शासकीय विश्राम गृह येथे भीमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष तथा खासदार चंद्रकांत हंडोरे यांच्या आदेशानुसार भीमशक्तीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक झाली. यात शहराची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी भीमशक्तीचे प्रदेशाध्यक्ष भाऊसाहेब साठे, शहर जिल्हा अध्यक्ष संजय जगताप, जिल्हा प्रभारी अध्यक्ष सुदामराव सरोदे, दक्षिण जिल्हा अध्यक्ष प्रल्हाद शिंदे, उत्तर जिल्हा अध्यक्ष संदीप मतकर, कार्याध्यक्ष हुसेन देशमुख, जिल्हा सचिव पोपटराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत निवड करून पत्र वाटप करण्यात आले.

यावेळी सुदाम सरोदे, विनायक साठे, सोमनाथ भोसले, अभिजीत सिंग, यश गायकवाड, ओम अहिरे, मयूर पांढरे, प्रथमेश वाघ, कौस्तुभ आडेप, पियुष वाघमारे, वेदांत थोरात, सुनील आडोळे, तेजस पांढरकर, तुषार साळवे, सनी गाढवे, प्रेम साठे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी शहर कार्यकारणी शहर जिल्हा अध्यक्ष संजय जगताप, उपाध्यक्ष अभय गायकवाड, शहर सचिव विशाल भिंगारदिवे, संघटक भाऊसाहेब भिंगारदिवे, संघटक रिजवान सय्यद, शहर जिल्हा संपर्कप्रमुख विनायक साठे, शहर संघटक सुनील ठाकरे, संघटक विवेक चंदनशिव, प्रसिद्धीप्रमुख अशोक खंडागळे अधिक पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

## भारतरत्न डॉ.एपीजे अब्दुल कलाम ग्राम गौरव पुरस्कार अहिल्यानगर जिल्ह्यातील डोंगरे बहुद्देशीय संस्थेला जाहीर

नगर – नगर जिल्ह्यातील स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेला जळगाव येथील टी.एन. हेल्प मल्टिपर्पज सोसायटीच्या वतीने माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम ग्राम गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. जळगाव येथे १३ एप्रिल रोजी संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. जावेद शेख यांनी दिली.



स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था नगर तालुक्यासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात विविध क्षेत्रात कार्य करत आहे. संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, कला, क्रीडा व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरु आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध कार्यक्रम घेऊन संस्थेने पर्यावरण संवर्धनासाठी मोठी जनजागृती केली आहे. स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जागृती, जलसंधारण जागृती मोहिम व रक्तदान शिबीर व्यापक स्वरुपात राबविण्याचे कार्य सुरु आहे. तसेच युवकांसाठी व्यसनमुक्तीवर विविध उपक्रम घेऊन जनजागृती केली जात आहे. राज्यस्तरीय काव्य संमेलनाच्या माध्यमातून नवोदित कवींना प्रोत्साहन देऊन, विविध लेखकांचे पुस्तक प्रकाशन करुन साहित्य चळवळीत योगदान सुरु आहे. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून गावपातळीवर ग्रामस्थांना आधार देण्याचे कार्य सुरु आहे. विविध स्पर्धा, महिला बचत गट मेळावे, काव्य व युवा संमेलन घेऊन समाजाला दिशा देण्याचे कार्य संस्थेच्या माध्यमातून सुरु आहे. या कार्याची दखल घेऊन डोंगरे संस्थेला टी.एन. हेल्प मल्टिपर्पज सोसायटीच्या वतीने माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम ग्राम गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.


मौलाना आझाद उर्दू हायस्कुलमध्ये सेवापूर्तीकाल साजरा करण्यात आला.

## मौलाना आझाद उर्दू हायस्कुलमध्ये सेवापूर्तीकाल साजरा

नगर – मोहंमदिया एज्युकेशन सोसायटी संचलीत मासुमिया शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्रशिक्षकांचा छात्रसेवाकालाचा समारोप मौलाना आझाद उर्दू मुलींचे हायस्कुलमध्ये पार पडला. छात्रशिक्षकांनी दैनंदिन तासिकांप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण करुन विविध उपक्रम, स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रश्नमंजुषा, टाकाऊपासून टिकाऊ, खेळ–वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मौलाना आझाद उर्दू मुलींचे हायस्कुलच्या मुख्याध्यापिका सय्यद फरहाना होत्या. प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ.प्रा. शेख अब्दुस सलाम, डॉ. शेख एजाज, शेख हसीब, सय्यद शबाना, शेख शबाना, सय्यद सबा आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापिका सय्यद फरहाना यांनी छात्रशिक्षकांच्या कामाचे कौतुक केले. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी छात्रशिक्षकांनी परिश्रम घेतले.

## पालकमंत्री, विधान परिषदेच्या सभापतींसह जिल्ह्यातील महायुतीच्या नवनिर्वाचित आमदारांचा २३ मार्च रोजी नगरमध्ये सत्कार सोहळा

### नगर तालुका महायुतीचे आयोजन, आ.शिवाजी कर्डिले यांची माहिती

नगर – जिल्ह्याचे पालकमंत्री, विधान परिषदेचे सभापती, व महायुतीचे नवनिर्वाचीत आमदार यांचा सत्कार समारंभ २३ मार्च रोजी सकाळी ११ वा.यशवंतराव चव्हाण सहकार सभागृह, स्टेशन रोड, येथे नगर तालुका महायुतीच्या वतीने आयोजीत करण्यात आला असल्याची माहीती आ. शिवाजीराव कर्डीले, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डीले यांनी पत्रकार परीषदेमध्ये दिली.


आ. शिवाजीराव कर्डिले


अक्षय कर्डिले

या कार्यक्रमाचे प्रमुख सत्कार मुर्ती जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, विधानपरिषदेचे सभापती ना.प्रा.राम शिंदे असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन व नगर राहुरी मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार शिवाजीराव कर्डीले राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील प्रमुख उपस्थित राहणार आहेत. यावेळी आ. मोनिकाताई राजळे, आ. संग्राम जगताप, आ. आशुतोष काळे, आ. काशिनाथ दाते, आ.विठ्ठलराव लंघे, आ. किरण लहामटे, आ. विक्रमसिंह पाचपुते, आ.अमोल खताळ या जिल्ह्यातील महायुतीच्या नवनिर्वाचित आमदारांचा सन्मान करण्यात येणार आहे

यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, शिवसेनेचे बाबुशेठ टायरवाले, भाजपाचे महानगर अध्यक्ष अभय आगरकर, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, सुनिल साळवे, संपत बारस्कर, सुरेंद्र थोरात आदी महायुतीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी महायुतीच्या पदाधिकारी – कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डीले, तालुकाध्यक्ष दिपक कार्ले, बाजार समिती सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ यांच्या वतीने करण्यात आले.

या पत्रकार परिषदेस सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ, दिलीप भालसिंग, दिपक कार्ले, संतोष म्हस्के, दिपक लांडगे, रेवणनाथ चोभे, धर्मनाथ आव्हाड, सुधीर भापकर, अभिलाष घिगे, सुभाष निमसे, बाजीराव हजारे, भाऊसाहेब ठोंबे, महेश वाघ आदी उपस्थित होते.

## जुन्या वाहनांसाठी एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यास ३० जूनपर्यंत मुदतवाढ

नगर – राज्यातील जुन्या वाहनधारकांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्याची अंतिम मुदत ३० जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली.

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० नुसार, १ एप्रिल २०१९ नंतर नोंदणी झालेल्या सर्व नवीन वाहनांसाठी एचएसआरपी पाटी बंधनकारक आहे. तसेच, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांसाठीही ही नंबर प्लेट बसवणे अनिवार्य आहे. यासाठी शासनाने पूर्वी ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदत दिली होती. मात्र वाहनधारकांचा प्रतिसाद अपेक्षेइतका नसल्याने ती वाढवून ३० जून २०२५ करण्यात आली आहे.

एचएसआरपी नंबरप्लेटसाठी अर्ज मोटार वाहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://transport.maharashtra.gov.in) करता येईल. तसेच, वाहनधारकांच्या अडचणी सोडवण्यासाठी परिवहन विभागाने सहायता कक्ष सुरू केला आहे. विहित मुदतीत एचएसआरपी नंबरप्लेट बसवले नाही, तर नियमभंगाच्या कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असेही श्री. सगरे यांनी कळविले आहे.

## माजी सैनिक व शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या तक्रार निवारणासाठी शुक्रवारी विशेष सुविधा

नगर – अहिल्यानगर उपविभागातील अहिल्यानगर व नेवासा तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे, माजी सैनिक, सैन्य दलात कार्यरत जवान आणि शहीद जवानांच्या कुटुंबीयांचे प्रलंबित कामे व तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रत्येक शुक्रवारी तक्रार अर्ज स्विकारण्यात येणार असल्याची माहिती अहिल्यानगर उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी दिली आहे.

प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवारी (शासकीय सुट्टी वगळून) दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी कार्यालय (जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अहिल्यानगर) येथे अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.

तक्रारींच्या तातडीने सोडवणुकीसाठी शासकीय व निम शासकीय कार्यालयांकडील प्रलंबित प्रकरणे या विशेष उपक्रमाद्वारे निकाली काढली जातील. त्यामुळे संबंधित नागरिकांनी आपल्या प्रलंबित कामांसाठी अर्जासह उपस्थित राहावे.




दिवसभराची धांदल, कामाचा ताण आणि खाण्यापिण्याच्या खराब सवयींचा आपल्या हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळेच हल्ली हृदयविकाराच्या झटक्यासारख्या घटना अचानक ऐकायला मिळत आहेत. हृदयविकाराचा झटका टाळण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे हृदयाचे ऐकणे आणि त्याचे संकेत समजून घेणे.



# हृदयविकाराचे 'हे' संकेत दुर्लक्षणे पडेल महागात

लाईफस्टाईल
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

हृदयविकाराचा झटका कधीच अचानक येत नाही. शरीर त्याच्या आगमनाच्या सुमारे एक महिना आधी सिग्नल देऊ लागते. हे समजून घेतल्यास ही जीवघेणी स्थिती टाळता येईल. याबाबत पुढील सात लक्षणांकडे चुकूनही दुर्लक्ष करू नये.

**इशारा देणारी लक्षणे**

*** छातीत सौम्य वेदना किंवा जडपणा**

तुम्हाला वारंवार हलके दुखत असेल किंवा छातीत जडपणा येत असेल, जळजळ किंवा दाब जाणवत असेल तर ते हलक्यात घेऊ नका. हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी, धमन्या हळूहळू ब्लॉक होऊ लागतात. त्यामुळे छातीत समस्या उद्‌भवू शकतात. काही वेळा ही वेदना खांदे, जबडा, मान आणि पाठीवरही पोहोचते. अशी लक्षणे दिसल्यास त्वरित तपासणी करून घ्यावी.

*** थकवा आणि अशक्तपणा**

काम न करता थकवा जाणवत असेल तर काळजी घ्या. कारण ही हृदयाच्या कमकुवतपणाची लक्षणे असू शकतात. हृदय शरीराच्या इतर भागांमध्ये पुरेसे ऑक्सिजनयुक्त रक्त पोहोचवू शकत नाही, तेव्हा शरीर लवकर थकते. हे लक्षण स्त्रियांमध्ये जास्त दिसून येते.

*** श्वास घेण्यात समस्या**

हलके चालल्यानंतर, पायऱ्या चढून किंवा एखादे काम केल्यावरही श्वास घेण्यास त्रास होत असेल, तर हेदेखील धोकादायक लक्षण असू शकते. यामध्ये हृदय योग्यरित्या रक्त पंप करू शकत नाही. अशा प्रसंगी फुफ्फुसात ऑक्सिजनची कमतरता असण्याकडे दुर्लक्ष करता कामा नये.

*** अस्वस्थ झोप**

रात्रीची झोप वारंवार हरवत असेल, विनाकारण अस्वस्थ वाटत असेल किंवा अचानक भीती वाटत असेल तर सावध व्हा. कारण हा हृदयविकाराचा इशारा असू शकतो. अनेक वेळा लोक या समस्यांना तणाव मानून दुर्लक्ष करतात; परंतु रक्तवाहिन्या अरुंद झाल्यामुळे असे होऊ शकते.

*** विनाकारण घाम येणे**

थंडी किंवा सामान्य हवामानातही जास्त घाम येणे हृदयविकाराचे लक्षण असू शकते. रक्त पंप करण्यात अडचण येते आणि जास्त काम करावे लागते, तेव्हा आपल्याला जास्त घाम येतो. असे झाल्यास ताबडतोब डॉक्टरांकडे जावे.



*** चक्कर येणे, डोके हलके होणे**

कोणत्याही कारणाशिवाय चक्कर येत असेल किंवा डोके हलके वाटत असेल तर ते कमकुवत हृदयाचे लक्षण असू शकते. हृदय शरीराच्या इतर भागांना योग्यरित्या रक्तपुरवठा करू शकत नाही, तेव्हा मेंदूमध्ये ऑक्सिजनची कमतरता असते. त्यामुळे ही समस्या निर्माण होते.

*** पोटदुखी, अपचन किंवा उलट्यासारखे वाटणे**

हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी काही लोकांना गॅस, अपचन, उलट्या किंवा पोटदुखी यासारख्या समस्या जाणवू शकतात. महिलांमध्ये या समस्या अधिक दिसतात. अशा समस्या उद्‌भवल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.



# मद्यपीमध्ये अल्कोहोलिक न्यूरोपॅथीची समस्या

आरोग्यभान
डॉ. महेश दळे

प्रमाणाबाहेर दारू पिणे हानिकारक आहे. अनेक संशोधनांमधूनही हे सिद्ध झाले आहे; पण दारू पिणाऱ्यांची संख्या कमी होत नाही. 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज'ने भौगोलिक प्रदेश, वय आणि लिंग या आधारावर २०४ देशांमध्ये मद्यपान करणाऱ्यांवर संशोधन केले. त्यात आढळून आले की १५ ते ३९ वर्षे वयोगटातील लोकांना मद्यपानामुळे सर्वाधिक धोका संभवतो. दारू अनेक आजारांना जन्म देऊ शकते. यामध्ये कर्करोगाचाही समावेश होतो. दारू पिण्याच्या दिवशीच अनेक समस्या उद्‌भवतात असे नाही, तर दुसऱ्या दिवशीही पायांमध्ये तीव्र वेदना होऊ शकतात. हे दुखणे कधीही हलक्यात घेऊ नये, कारण ही एक गंभीर समस्या असू शकते.

**दारू पिल्याने पाय का दुखतात?**

जास्त मद्यपान केल्याने अल्कोहोलिक न्यूरोपॅथीची समस्या उद्‌भवू शकते. यामुळे मेंदूशी जोडलेल्या मज्जासंस्थेला गंभीर नुकसान होते. या समस्येमध्ये, हात आणि पाय हलवण्यास त्रास होतो. मूत्राशय आणि आतड्यांमध्येही समस्या उद्‌भवू शकतात. अल्कोहोलमुळे काही नसादेखील खराब होऊ शकतात.

**अल्कोहोलिक न्यूरोपॅथीची लक्षणे?**

शरीराच्या खालच्या भागात वेदना, पायामध्ये सतत वेदना, मुंग्या येणे, पिन आणि सुया जाणवणे (पॅरेस्थेसिया) स्नायूंमध्ये पेटके येणे आणि कमजोरी जाणवणे, समतोल राखण्यात अडचण, बद्धकोष्ठता, अतिसार, लघवी करण्यास त्रास होणे. लैंगिक रोग, नपुंसकता, कमी रक्तदाब, हृदयाचे जलद ठोके (टाकीकार्डिया) भरपूर घाम येणे, उलट्या, मळमळ चक्कर येणे.

**कारणे**



अल्कोहोलसंबंधित न्यूरोपॅथीची नेमकी कारणे पूर्णपणे उमगलेली नाहीत. तथापि, संशोधकांना आढळून आले आहे, की दीर्घ कालावधीमध्ये जास्त प्रमाणात मद्यपान केल्याने मज्जातंतूंना हानी पोहोचते. त्यामुळे ही समस्या उद्‌भवते. कुपोषण हेदेखील यामागचे एक कारण आहे. शरीर मज्जासंस्थेसाठी आवश्यक जीवनसत्त्वे आणि पोषक तत्त्वे ज्या प्रकारे शोषून घेते, त्यावर अल्कोहोल परिणाम करू शकते. दीर्घकाळ अल्कोहोल सेवन केल्याने शरीरात ऑक्सिडेटिव्ह तणाव आणि जळजळ होऊ शकते. हे मज्जातंतूंच्या सभोवतालच्या मायलिनच्या नुकसानीशी संबंधित आहे

**उपचार**

* नाल्ट्रेक्सोन, ॲकॅम्प्रोसेट आणि डिसल्फिराम.
* वर्तन थेरपीची मदत
* व्यावसायिक डॉक्टरांची मदत
* मद्यपान सोडण्यास मदत करणाऱ्या गटात सामील व्हा

अल्कोहोल-संबंधित न्यूरोपॅथी टाळण्यासाठी काय करावे?

* पुरुषांनी दररोज दोन पेग तर महिलांनी एक पेगपेक्षा जास्त दारू पिऊ नये.
* अल्कोहोलसंबंधित न्यूरोपॅथीची लक्षणे आढळल्यास अल्कोहोल पिऊ नये.
* मद्यपान सोडू शकत नसल्यास समुपदेशकाची मदत घ्यावी.
* चांगला आणि संतुलित आहार घ्यावा. जीवनसत्त्वे आणि इतर पोषक तत्वांची कमतरता पूर्ण करावी.
* आठवड्यातून किमान १५० मिनिटे व्यायाम करावा.



# हेडफोनचा मेंदूवर वाईट परिणाम

व्याधी विचार
डॉ. रवींद्र सोमाणी

बरेच लोक बहुतेक वेळा हेडफोन घालतात. विशेषतः तरुणांमध्ये ही सवय झपाट्याने वाढत आहे. आजकाल बाहेरचा आवाज येऊ नये, म्हणूनही हेडफोन्सचा वापर झपाट्याने वाढत आहे. हे उपकरण बाहेरील आवाजापासून संरक्षण करत असले, तरी त्याचा मेंदूवर वाईट परिणाम होत आहे.

लंडनच्या 'नॅशनल हेल्थ सर्व्हिसेस' च्या ऑडिओलॉजिस्टने इशारा दिला आहे की हेडफोन्सच्या जास्त वापरामुळे मेंदूच्या तसेच ऐकू येण्याच्या समस्या वाढल्या आहेत. हेडफोन्समुळे होणारी हानी ऐकण्याच्या क्षमतेशी संबंधित नसून मेंदूशी संबंधित असल्याचे आतापर्यंतच्या तपासात समोर आले आहे. जे काही ऐकतो त्यावर प्रक्रिया करण्यात मेंदूला त्रास होतो.

**हेडफोन्समध्ये काय समस्या आहेत?**

तरुणांमधील श्रवण प्रक्रिया विकार या स्थितीला 'ऑडिटरी प्रोसेसिंग डिसऑर्डर' (एपीडी) म्हणतात. मेंदूला शब्द किंवा ध्वनीवर प्रक्रिया करण्यात अडचण येते, तेव्हा असे घडते. 'एपीडी' ही ऐकण्याच्या क्षमतेमधील कमतरता नाही, तर बाह्य आवाजावर प्रक्रिया करण्याच्या मेंदूच्या क्षमतेमध्ये निर्माण होणारी समस्या आहे.

**मेंदूवर काय परिणाम होतो ?**

श्रवण प्रक्रिया विकार असलेल्या लोकांना गोष्टी लवकर समजण्यास त्रास होऊ शकतो. हा विकार सामान्यतः कानात संक्रमण आणि बालपणातील जखमांशी संबंधित आहे. आवाज रद्द करणारे हेडफोन हे त्याचे एक कारण असल्याचे मानले जाते. हे ठरवण्यासाठी मेंदूला एखाद्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करावे लागेल, त्याला आवाज ऐकावा लागेल. पार्श्वभूमीतील आवाज अवरोधित केले असतील, तर मेंदू त्यांना फिल्टर करणे विसरू शकतो. हेडफोन घातल्याने तुम्हाला ऐकायचे आहे तेच तुम्ही ऐकता. वास्तविक, आवाज रद्द करणाऱ्या हेडफोन्सची वारंवारता कमी असते. त्यामुळे कानाचे रिसेप्टर्स उत्तेजित होतात आणि मेंदूला चुकीचे संदेश पाठवू लागतात.

**कान, मेंदूवर परिणाम**

कानापर्यंत कोणताही आवाज पाठवला नाही, तर मेंदू त्याच्या आत येणाऱ्या गोष्टी वाढवून भरपाई करतो. हे न्यूरल मार्ग बदलते. 'नॉईज कॅन्सलेशन टेक्नॉलॉजी' बाह्य आवाज कमी करण्यासाठी काम करते; परंतु काही वेळा हेडफोन्समधून प्रतिध्वनीसारखा आवाज निघतो. तो बराच काळ ऐकला तर कान आणि मेंदूवर परिणाम होऊ शकतो.

**आवश्यकतेपेक्षा जास्त हेडफोन घालण्याचे तोटे**


* चक्कर येणे
* लक्ष केंद्रित करण्यात अडचण
* अस्वस्थता
* कान दुखणे
* झोप न येणे

# दहा ते पंधरा टक्के लोकांमध्ये वंध्यत्व

आरोग्य विशेष
डॉ. रामदास आव्हाड

बिघडलेली जीवनशैली आणि खाण्याच्या सवयी पुरुषांच्या शुक्राणूंची गुणवत्ता खराब करत आहेत. 'इंडियन सोसायटी ऑफ असिस्टेड रिप्रोडक्शन'च्या मते १०-१४ टक्के भारतीय पुरुष आणि स्त्रिया वंध्यत्वाने ग्रस्त आहेत. प्रत्येक १५ भारतीय जोडप्यांपैकी एक या समस्येशी झुंजत आहे.

पुरुषांमध्ये शुक्राणूंचे प्रमाण, त्याची गुणवत्ता आणि शुक्राणूंचे आयुष्य कमी होणे हे याचे कारण आहे. वंध्यत्व असल्यास पुरुष पिता बनू शकत नाही. अशा परिस्थितीत शुक्राणूंची संख्या का कमी होत आहे, ते कमी झाले आहे हे कसे कळणार, असे प्रश्न उपस्थित होतात. शुक्राणूंची संख्या कमी होण्यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे वाईट जीवनशैली. लठ्ठपणा, फास्ट फूड, दारू-सिगारेट, लॅपटॉप मांडीवर घेऊन काम करणे आणि मोबाईल खिशात ठेवणे



**शुक्राणूंची संख्या किती असावी?**

जेरुसलेममधील हिब्रू विद्यापीठातील प्रोफेसर हागाई लेव्हिन म्हणतात की साधारणपणे एका मिलिलिटर वीर्यामध्ये चार कोटींपेक्षा कमी शुक्राणू असणे म्हणजे वंध्यत्वाची समस्या. २०२२ मध्ये त्यांचे एक संशोधन समोर आले. त्यात शुक्राणूंच्या संख्येबाबत जागतिक ट्रेंड स्पष्ट केले गेले. त्यानुसार १९७३ ते २०१८ पर्यंत शुक्राणूंची संख्या वार्षिक १.२ टक्क्यांच्या दराने कमी झाली, जी दहा कोटी ४० लाखांवरून चार कोटी ९० लाख प्रति मिलीलीटर झाली आहे. २०२० पासून या संख्येत वार्षिक २.६ टक्के घट झाली आहे.

**शुक्राणूंची संख्या कशी तपासायची?**

शुक्राणू चाचणी किटद्वारे घरच्या घरी शुक्राणू संख्या तपासता येते. तथापि, हे केवळ शुक्राणूंची संख्या काय आहे हे सांगते. ही चाचणी शुक्राणूंबद्दल जास्त माहिती देऊ शकत नाही. या किटसह दहा मिनिटांमध्ये निकाल उपलब्ध होतात. दोन कोटींपेक्षा जास्त शुक्राणू असतील, तर संबंधित व्यक्ती पिता बनू शकत नाही, असा अर्थ असा नाही. कारण पुरुषांची प्रजननक्षमता इतर अनेक बाबींवरही अवलंबून असते. त्यामुळे शुक्राणूंची चाचणी केवळ लॅब किंवा व्यावसायिकांकडून करून घेणे चांगले.

**शुक्राणूंची संख्या कमी होण्याची चिन्हे**

* शुक्राणूंच्या कमतरतेमुळे अंडकोषातून बाहेर पडणाऱ्या नसांना सूज येऊ शकते.
* काही लैंगिक संक्रमणामुळे शुक्राणूंची संख्या कमी होऊ शकते.
* स्खलन समस्यादेखील शुक्राणूंची संख्या कमी होण्याचे लक्षण असू शकते.
* शारीरिक संबंध ठेवण्याची इच्छा नसणे
* शुक्राणूंची कमी मात्रा * अंडकोषांमध्ये वेदना * वारंवार श्वसन संक्रमण

आरोग्यचर्चा

## स्थूलपणाकडे डोळेझाक नको

स्थूलपणा ही एक व्याधी आहे. ही समस्या मधुमेह, उच्च रक्तदाबापासून हृदयविकार, कर्करोगासारख्या दुर्धर आजारांना कारणीभूत ठरते. एवढंच नाही तर स्थूलपणा तुमच्या चव घेण्याच्या क्षमतेवरही परिणाम करू शकतो. कोणताही पदार्थ खाताना त्याची चव महत्त्वाची ठरते. म्हणूनच आपण चवीने खातो, असे म्हणतो. पण स्थूलपणा तुम्हाला चवीने खाऊ देणार नाही. कारण या समस्येमुळे तुम्हाला अन्नपदार्थांची चवच कळणार नाही. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. एका नावाजलेल्या वैद्यकीय जर्नलमध्ये हा शोध प्रकाशित झाला आहे. चव घेण्याच्या क्षमतेवर होणारा स्थूलत्वाचा परिणाम जाणून घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी स्थूल उंदरांचा अभ्यास केला. त्यातून त्यांनी काही निष्कर्ष काढले आणि ही धक्कादायक बाब समोर आली.



दंतारोग्य



## दात घासण्याचा कंटाळा करताय?

तुम्ही रात्री दात घासायचा कंटाळा करता का? एखाद्या दिवशी दात न घासताच न्याहरी करता का? मग ही माहिती तुमच्यासाठी धोक्याचा इशारा देणारी आहे. तोंडाच्या आरोग्याकडे, दातांच्या स्वच्छतेकडे होणारं दुर्लक्ष आपल्याला चांगलंच महागात पडू शकतं. यामुळे यकृताच्या कर्करोगाचा धोका ७५ टक्क्यांनी वाढत असल्याचं तज्ज्ञांनी स्पष्ट केलं आहे. बेलफास्टच्या क्वीन विद्यापीठात यासंबंधीचा एका अभ्यास मध्यंतरीचा केला गेला. निष्कर्षाप्रत येण्याआधी संबंधितांनी इंग्लंडमधील चार लाख ६९ हजार लोकांचा अभ्यास केला होता. त्यामुळे तोंडाच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्यांनी सावध होण्याची गरज आहे, हे ओळखायला हवे.

नेत्रारोग्य

## मायोपियापासून दूर राहा

संगणक, स्मार्टफोन वा अशा कोणत्याही स्क्रिनकडे सतत डोळे लावून बसण्याच्या चुकीच्या सवयीमुळे अलिकडे नेत्रविकारांमध्ये वाढ होत आहे. डोळे कोरडे होणं, डोळ्यांमधून पाणी येणं, अनपेक्षितपणे चष्मा लागणं अशा समस्या वाढत आहेत. त्यातच मायोपिया या विकाराचं प्रमाणही वाढताना दिसत आहे. हा विकार झालेल्या रुग्णाला फक्त जवळचं दिसतं. एखादी वस्तू खूप जवळ आणल्याशिवाय त्याला दिसत नाही. संगणक, स्मार्टफोनचा अतिवापर मायोपियाला कारणीभूत ठरत आहे. डोळ्यांशी संबंधित व्यायामांनी मायोपियाला आळा घालता येतो. त्यामुळे तुम्हालाही हा त्रास जाणवत असेल तर नेत्रतज्ज्ञांच्या सल्ल्याने डोळ्यांचे व्यायाम करायला सुरुवात करा आणि नेत्रारोग्य जपा.



नोंद घ्या



## आरोग्य टिकवण्यासाठी...

पचनसंस्थेचं कार्य सुरळीत असेल तर आपलं आरोग्यही उत्तम रहातं. पचनसंस्थेचं कार्य सुधारण्यात काही नैसर्गिक घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. जसे की, मेथीदाण्यांमध्ये पचनशक्ती सुधारण्याची क्षमता असते. तेव्हा पोटाला आराम देण्यासाठी थोडे मेथीदाणे तोंडात टाकून नीट चावून खा. यामुळे पचनासंबंधीच्या तक्रारी दूर होतील. सारखं पोट बिघडण्याची समस्या असणाऱ्यांनी आल्याचं नियमित सेवन करायला हवं. आल्याचा वापर वेगवेगळ्या पद्धतींनी करता येतो. आल्याचा तुकडा चघळला तरी बराच आराम मिळतो. कोरफडीच्या गरामुळेही पोटाच्या तक्रारी दूर होतात. कोरफडीमुळे शरीरातली विषद्रव्यं निघून जातात आणि पचनशक्ती बळकट होते. त्यामुळे कोरफडीपासून गरापासून केलेले पेय घ्यावे आणि निरोगी राहावे.

# आपल्यासाठी डोळ्यांत पाणी येणारेच आपले

**प्रा.डॉ.विनोद बाबर यांचे प्रतिपादन**

नगर – आजच्या व्हॉटसअप, फेसबुक, इन्स्ट्राग्राम–च्या जगातील एकही जण आपल्या अडीअडचणीत–दुःखद प्रसंगात आपल्या जवळ बसून पाठीवर हात ठेवत आधार देत नाही की आपण हॉस्पीटलच्या आयसीयूमध्ये उपचार घेताना आपल्या काळजीने भेटायला येत नाही. आपल्यासाठी डोळ्यांत पाणी येणारे मोजकेच मित्र आणि रक्ताचे नातेवाईकच आपले असतात, या वास्तववार प्रवचनकार प्रा.डॉ.विनोद बाबर (कराड) यांनी बोट ठेवले.



भगवान महावीर व्याख्यानमालेचा शुभारंभ प्रा.डॉ. विनोद बांगर यांच्या व्याख्यानाने झाले. त्यातील विविध क्षणचित्रे समवेत उपस्थित जैन बांधव.

## भगवान महावीर व्याख्यानमालेचा शुभारंभ

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी महाराज यांच्या ३३ व्या पुण्य स्मृतीदिन व १२५ व्या जन्मोत्सवानिमित्त जैन सोशल फेडरेशनने प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू केलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प काही तरी चुकतंय आपलं या विषयावर गुंफताना आनंदधाममध्ये ते बोलत होते. सौ.मनिषा व निखिलेंद्र लोढा यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. सरोजताई कटारिया यांनी सूत्रसंचालन केले.

श्री. बाबर पुढे म्हणाले, आज जग जवळ आले असे म्हटले जात असले तरी एका घरात रहाणारे एकमेकांपासून दुरावत चालले आहेत. घरातील आपल्या माणसांसोबत आपलेपणाने दिलखुलास संवाद झाला पाहिजे. तो न करता आपण मोबाईलच्या आभासी जगात वावरणे पसंत करत असू तर आपणास मानसोपचार तज्ज्ञास भेटणे अत्यंत आवश्यक आहे, हे लक्षात घ्या. मोबाईलचा वापर आवश्यक कामापुरता केल्यावर मोबाईलपासून दूर रहाण्याचा प्रयत्न करा. झोपताना–झोपेमधून उठताना मोबाईल पहाणे टाळा. आपल्या घरातील लहान मुलांच्या हाती मोबाईल ठेवून तो मोबाईलशिवाय रहात नाही, हा खोटा मोठेपणा मिरवू नका. घरातील ५० वर्षांचा नवरा तुमचं ऐकतो मग २ वर्षाचा नातू का ऐकत नाही? त्याच्या हातातून मोबाईल काढून घेवून त्याच्याशी बोलण्यासाठी सुसंस्कार करण्यासाठी वेळ द्या.

आपण कष्टाने कमावलेल्या पैशांचा आनंद घ्या. अधिक संपत्ती, अधिक बचत, अधिक गुंतवणूक करण्याच्या नादात जगायचे राहून गेले असे होवू देऊ नका. आपल्या शब्दाने आपल्या कृतीने कुणीही दुखावले जाणार नाही याची सदैव काळजी घ्या. जर असे घडले तर लगेच भेटून माफी मागा. माफी मागण्यासाठी वाघाचं काळीज लागतं. आपलं जीवन कधी थांबणार हे माहिती नसल्याने हे जग सोडून जाताना कोणाशीही वैर राहू नये, याची काळजी घेत देवाने दिलेल्या जीवनाचा आनंद घ्या. आपले शरीर ही अनमोल संपत्ती आहे. ज्याचे शरीर उत्तम तो जगात सर्वात श्रीमंत. धाव–धाव करून कोट्यवधीची इस्टेट कमवली तरी आपल्याला साथ फक्त शरीरच देणार हे विसरू नका. आपले आई–वडिल हेच आपले आयडॉल असले पाहिजेत. आपल्याला जन्म दिला हे सुंदर शरीर दिले. लहानाचं मोठं केलं. आपल्याला जगवण्यासाठी अपार कष्ट घेतले तरीही आमच्यासाठी काय केलं? असं म्हणून आई–बापरूपी देवाला कधीही दुखवू नका. भाड्याच्या घरात जीवन घालवलेल्या आई–वडिलांना बंगल्यात रहाण्याचा आनंद मिळवून द्या. माझी गाडी माझी माडी माझ्या बायकोची गोल गोल साडी या संकुचित विचारातून वेळीच बाहेर पडा. जर्मनीत मृत्यू झाल्यावर रडण्यासाठी भाड्यानं माणसं आणावी लागतात. आपल्या मृत्यूनंतर असे होवू नये याकरिता आपल्या मायेची माणसं मिळवा.

खिशात पैसे असले तरच मैत्रीचे हात पुढे येतात, अशा मित्रांपासून दूर रहा. त्यांच्यासोबत जीवनातील वेळ वाया घालवू नका. आपली पारखं असलेल्यांसोबतच रहा. आज सर्व आजारांवर मेडिकलमध्ये औषधे मिळतात पण मनाचा आजार दूर करायला जीवाभावाचीच माणसं लागतात. ईश्वर संकट ज्यांच्या वाट्याला देतो ज्यांची संकट पेलण्याची ताकद असते. ते येरा–गबाळ्याचं काम नाही! झोपण्यासाठी झोपेची गोळी घ्यावी लागणे ही दुर्देवाची गोष्ट आहे. स्वतःपुरता विचार करण्याचे सोडून द्या. आयुष्य खुप सुंदर आहे जगून घ्या, असे आवाहन श्री.बाबर यांनी केले.

सिमा मुनोत यांनी आभार मानले.

# शहरातील शांतीमार्च मार्गावरील साफसफाई त्वरित करण्यात यावी



मीनाताई चोपडा

नगर – राष्ट्रीय संत आचार्यसम्राट आनंदऋषिजी म.सा. यांच्या महानिर्वाणानिमित्त २८ मार्च रोजी जैन समाजाचा शांती मार्च नवीपेठ ते घास गल्ली, तेलीखुंट, दाळमंडई, आडते बाजार, सराफ बाजार, जुना कापड बाजार, खिस्त गल्ली, संगम चौक, बुरूड गल्ली, बंगाल चौकी, वसंत टॉकीज रोड, मार्केट यार्ड चौक, सहकार सभागृह रोड ते आनंदधाम असा शांती मार्च सकाळी ७ ते १० या वेळेत असतो. त्यावेळी जैन समाजातील हजारो माता, भगिनी, ज्येष्ठ नागरिक या रस्त्यावरून पायी जात असतात. त्यावेळेस हा रस्ता चांगल्या पध्दतीने साफ व स्वच्छ करून त्यावर पावडर मारण्यात यावी.

तसेच आनंदधाम परिसरात २० ते २८ मार्च रोजी सकाळपासून ते रात्री १० वाजेपर्यंत धार्मिक कार्यक्रमाचे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच २१ ते २८ मार्चपर्यंत देशभरातील वक्त्यांच्या व्याख्यानमाला रात्री ६.३० ते १०.०० पर्यंत असतात. त्यावेळेस ज्येष्ठ नागरिक व महिलांची गर्दी होते. आनंदधाम समोरील भक्तनिवासात रक्तदान शिबिरासाठी महिला व पुरूष मोठ्या प्रमाणात येत असतात. त्यामुळे या परिसरातील साफसफाई व तेथील पोलवरील बंद असलेल्या स्ट्रिट लाईटस् चालू करण्यात याव्यात. जेणेकरून येणाऱ्या सर्व समाजातील नागरिकांना याचा त्रास होणार नाही.

संबंधितांना काम करण्याबाबत त्वरित आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे माजी नगरसेविका मीनाताई चोपडा यांनी महानगरपालिका आयुक्तांना केली आहे.

# शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे हटविणार

**महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

मुंबई – शासकीय जमिन व देवस्थान इनाम जमिनीवर झालेली अतिक्रमणे महसूल, पोलीस आणि स्थानिक प्रशासनाच्या मदतीने हटवली जातील, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लक्षवेधीच्या उत्तराप्रसंगी सांगितले.

सदस्य मोनिका राजळे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय जमीन व देवस्थान इनाम जमिनीवर अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण संदर्भात लक्षवेधी उपस्थित केली होती.

मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, संबंधित तालुक्याचे तहसीलदार, पोलीस विभाग आणि स्थानिक प्राधिकरण यांची बैठक घेऊन यासंदर्भात कार्यवाही केली जाईल.

ग्रामपंचायत व नगरपालिका हद्दीत असलेल्या अतिक्रमणांसाठी स्थानिक प्रशासनाला जबाबदारी सोपवली जाईल. महसूल विभागाच्या अखत्यारितील अतिक्रमण हटवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांवर असेल. तर गृह विभागाच्या निर्णयानुसार, अनधिकृत धार्मिक स्थळांवरही कायदेशीर कारवाई केली जाईल असेही त्यांनी सांगितले.

# मीटरमध्ये छेडछाड करून केली वीजचोरी; ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – घरगुती वापराच्या वीज मीटर मध्ये छेडछाड करून परसेंटेज पट्टीची वायर कट करून वीज चोरी करणाऱ्या ६ जणांच्या विरुद्ध महावितरणच्या च्या भरारी पथकाने कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. शहरातील सर्जेपुरा भागातील विनसेनपूरा व तेलीखुंट येथे ही कारवाई करण्यात आली आहे.

कल्याण पूर्व विभाग महावितरणचे भरारी पथकातील उपकार्यकारी अभियंता सुदर्शन कुमार राजाराम कांबळे (रा. कल्याण (पूर्व) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की वीज चोरीचे प्रमाणात वाढ झाल्यामुळे वीज ग्राहकांच्या मीटर व वीज पुरवठ्याची तपासणी करून वीज चोरी शोधून त्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. या मध्ये भरारी पथकासह तपासणीकरिता तेलीखुंट येथे गेले असता शेख एनुल बाबासाहेब व एस के याकूब यांनी मीटरमध्ये छेडछाड केल्याचे निदर्शनास आले. या दोघांनी जुलै २०२२ ते जून २०२४ या २४ महिन्यात एकूण ३ हजार २६३ युनिट वीज चोरी करून महावितरणचे ७८ हजार १०० रुपये इतक्या रकमेचे नुकसान केले असून वीज चोरीचा बिल भरणा केला परंतु तडजोडीची रक्कम दहा हजार रुपये न भरल्याने शेख एनुल व एस के याकूब याच्याविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २०२३ चे कलम १३५ , १५१ नुसार गुन्ह्याची नोंद केली.

दुसऱ्या कारवाईत सर्जेपुरा येथील विनसेपूरा येथील बी जे उगलमुगले यांच्याकडे राहणारे वसीम आयुब पठाण, उस्मान शेख मेहबूब, नसीर मोहम्मद खान हे राहत असलेल्या जागेतील इलेक्ट्रिक मीटर ची तपासणी केली असता मीटरचे सील तुटलेले आढळून आले मीटरमध्ये परसेंटेज पट्टीवरील वायर कट असल्याचे आढळून आले. या चौघांनी जुलै २०२२ ते जुलै २०२४ या २४ महिन्यात एकूण ९ हजार १६० युनिट वीज चोरी करून महावितरणचे २ लाख ५८ हजार ५७० रुपये एवढ्या रकमेचेनुकसान केले असून वीज चोरीचे बिल, तसेच तडजोडीची रक्कम ८ हजार रुपये या दोन्हीही रकमा न भरल्यामुळे चौघाविरुद्ध भारतीय विद्युत कायदा २०२३ चे कलम १३५ व १५१ अन्वये गुन्ह्याची नोंद केली. पुढील कारवाई पोलीस करीत आहे.

# गुहा येथील कानिफनाथ देवस्थान जवळील अतिक्रमणे हटवा, २४ मार्चपासून नाथभक्तांचे तहसीलसमोर 'आमरण उपोषण'

नगर – अहिल्यानगर जिल्हातील राहुरी तालुक्यातील गुहा येथील कानिफनाथ देवस्थान जवळील इनामी शेत जमीन गट नंबर २० ते २४ व २६ ते ३१ यातील सर्व अनाधिकृत असलेले बांधकामे त्वरित काढावे. या मागणीसाठी गुहा येथील नाथ भक्तांनी तहसीलदार नामदेव पाटील यांना निवेदन दिले आहे. तसेच अतिक्रमण हटवली नाही तर २४ मार्च पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा नाथ भक्तांच्या वतीने देण्यात आला.



गुहा येथील कानिफनाथ देवस्थान जवळील अतिक्रमणे हटवा, या मागणीसाठी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

कानिफनाथ देवस्थान गुहा येथील या अगोदरही अनाधिकृत बांधकाम काढण्यासाठी २०१६ पासून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार यांना अनेक वेळा नाथ भक्तांच्या वतीने येथील अनाधिकृत अतिक्रमणे काढण्यासाठीचे निवेदन देण्यात आले होते. मात्र अध्याप हे अतिक्रमणे काढली नसताना नाथ भक्तांच्या वतीने तहसीलदार नामदेव पाटील यांना निवेदन देऊन अतिक्रमणे काढा अन्यथा २४ मार्च पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला. यावेळी आबासाहेब कोळसे, किरण कोळसे, मच्छिंद्र कोळसे, ऋषिकेश बांगरे, शशिकेश कोळसे, अँड प्रसाद कोळसे, सचिन कोळसे आदींसह नाथ भक्त उपस्थित होते.

दरम्यान २१ मार्च रोजी आ. मोनिका राजळे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील इनामी जमिनी विषयी विधानसभेत लक्षवेधी मांडली. यामध्ये गुहा येथील इनामी जमिनीवर अतिक्रमण झाले आहे. या संदर्भात विधानसभेत लक्ष वेधले. या संदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी योग्य ती कारवाई करू असे आश्वासन विधानसभेत दिले आहे. त्यामुळे सोमवारी हे अतिक्रमण निघेल असे ग्रामस्थांना वाटत आहे.



तारकपूर बसस्टॅण्ड येणाऱ्या बसेस कमी झाल्यामुळे प्रवाशांची प्रचंड गैरसोय होत आहे. एकाच बसला अशी गर्दी होत आहे तर दुसऱ्या छायाचित्रात ओस पडलेले तारकपूर बसस्टॅण्ड.

# तारकपूर स्थानकात एसटी बसेस येण्यास बंद

**रस्त्याचे काम अर्धवट, डिएसपी चौक मार्गे बस जातात निघून; प्रवाशांची गैरसोय, धावपळ, पूर्वीप्रमाणे एसटी स्थानकात येण्यासाठी योग्य नियोजन करा**

नगर – शहरातील तारकपूर रस्त्याचे काम काही महिन्यांपासून अर्धवट असल्याने तारकपूर बस स्थानकात एसटी बसेस येण्यास बंद झाल्या असून, बस स्थानकातील प्रवाशांची गैरसोय होत आहे. तर अनेक अडचणींचा सामना करुन प्रवाशांना एसटी धरावी लागत असून, तारकपूर आगार व्यवस्थापकाने पूर्वीप्रमाणे एसटी बसेस बस स्थानकात येण्यासाठी योग्य नियोजन करण्याची मागणी प्रवाश्यांकडून होत आहे.

तारकपूर रस्त्याचे काम काही महिन्यांपासून सुरु आहे. तारकपूर बस स्थानक समोरील एका बाजूचे काम पूर्ण झाले असून, उर्वरीत बाजूचे काम प्रलंबीत आहे. मात्र वाहतुक कोंडी होत असल्याचे कारण पुढे करुन बस स्थानकात येणारे बसेस सकाळी ९ नंतर येण्याचे बंद झाल्या आहेत. मोजक्याच काही बस येत असल्याने त्यासाठी प्रवाश्यांची मोठी गर्दी होत आहे. तारकपूर बस स्थानक येथून विविध कामानिमित्त गावाकडे आणि इतर शहरामध्ये जाणाऱ्या प्रवाशांचे हाल होत आहे.

गावाला आणि विविध शहरात जाणारे नागरिक तारकपूर बस स्थानकात येतात, मात्र बस येणार की नाही याची शाश्वती नसल्याने हिरमोड होवून माळीवाडा बस स्थानकाकडे वळतात. परिणामी तारकपूर येथील प्रवाशांना ताटकळत उभे रहावे लागत आहे. तर काही बस आल्यास त्यामध्ये बसण्यासाठी प्रवाशांची झुंबड उडत आहे. एसटी बस गाड्या तारकपूर बस स्थानकावर न थांबता माळीवाडा बस स्थानक किंवा पुणे बस स्थानकावर थांबून पुढे जात असल्याने बस धरण्यासाठी महिलांसह लहान मुले, शालेय विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांची कसरत होत आहे.

पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई आदी ठिकाणी जाणाऱ्या गाड्या तारकपूर बस स्थानकात न थांबता पुढे जात आहे. यासाठी नागरिकांना डीएसपी चौकात थांबून एसटी धरण्याची वेळ येत आहे. रस्त्याचे काम दोन ते तीन महिन्यांपासून सुरु असल्याने तारकपूर बस स्थानकातील एसटी सेवा विस्कळीत झाली आहे.

माळीवाडा बस स्थानकाचे देखील नुतणीकरणाचे काम सुरु असल्याने तेथे देखील एकाचवेळी अनेक एसटी बसेस येत असल्याने जागेची कमतरता भासत आहे. हा ताण पूर्णतः स्वास्तिक चौक येथील पुणे बस स्थानकावर येत असून, कमी जागा असताना तेथे मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी एसटी महामंडळ प्रशासनाकडून योग्य नियोजनाची गरज आहे. तारकपूर रस्त्याच्या एका बाजूचे काम पूर्ण झालेले असताना एसटी बस गाड्यांना पूर्वीप्रमाणे तारकपूर बस स्थानकात थांबविणे आवश्यक आहे, ज्यामुळे प्रवाशांची गैरसोय कमी होणार आहे. परीक्षा कालावधी संपल्यानंतरच मोठ्या प्रमाणात सुट्ट्यामुळे एसटीला मागणी वाढणार असून याकडे एसटी महामंडळ प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. एसटी महामंडळ प्रशासनाने या समस्येचे गांभीर्य ओळखून लवकरात लवकर उपाययोजना करण्याची मागणी प्रवाशांमधून होत आहे.

# पवन श्रीकांत ईराण दौरा यशस्वी



नगर – नुकताच येथिल संगीत गायक, गुरू व अभ्यासक पवन श्रीकांत नाईक यांनी जागतिक संगीत महोत्सव तिसरा दौरा यशस्वीरीत्या झाला. ४० व्या फज्र आंतरराष्ट्रीय संगीत महोत्सव, तेहरान (ईराण) येथे आयोजित केला गेला होता. ७ दिवसीय महोत्सवात पवन नाईक यांना दोन मैफलींसाठी विशेष निमंत्रित कलाकार म्हणून सहभाग नोंदविला. पहिली मैफल ईराणी कलाकारांसह तर दुसरी मैफल फक्त भारतीय कलाकार असे हे स्वरूप होते.

संपूर्ण जगातील विविध देशांतून ७५ कला समुह यात सहभागी झाले होते. पवन नाईक मैफलीत भारतीय शास्त्रीय संगीतातील राग बागेश्री, मधूवंती, किरवाणी, दरबारी, व भैरवीत बंदिशी सादर केल्या तसेच अरबी, फारसी, उर्दू, हिंदी व पंजाबी भाषेतील जीवन तत्वज्ञान दर्शक गीते सादर केली. अवा ए जमीन (Sound Of the Earth) या विशेष (इंडो – पर्शियन) कलावृंदासह हा नाईक यांचा चौथा दौरा होता. भारतातून उदय देशपांडे (तबला) व नेपाळयेथून विवेक सॅम्युएल (मोहन विणा) साथसंगत केली.

ईराण मधिल अवा ए जमीन चे सर्वेसर्वा वाहिद आईर्यान (गायक, संगीतकार व तंबूर वादक) हे आयोजन विशेष पुढाकार घेतला होता. सोबत मोज्तबा कलंतरी (सेतार व डफ) तसेच अली शेहबाजी, नासरीन अब्दुलवंद, सरीना अमरोल्लाही, लैला येकानी जादे, जाहरा गोजिरी, बेसिक शश्मिनी गीयाजवंद, मोहम्मदरेजा. अलिजादे व अलीजादे रुस्तम हे सर्व पर्शियन कलाकार तंबूर साथ व सहगायन साथ दिली. नाईक यांना शास्त्रीय संगीत व शब्दप्रधान गायकीसाठी गुरू शुभलक्ष्मी गुणे, सुरेश साळवी, मधुसूदन बोपर्डीकर, रेवन्नाथ भनगडे, सतीश आचार्य, कुमुदिनी बोपर्डीकर, शुभांगी मांडे, वीणा कुलकर्णी, रघुनाथ केसकर, डॉ. शुभांगी बहुलीकर व डॉ. विकास कशाळकर यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. सूफी, उर्दूसाठी मरहूम ख़लिल मुजफ्फर, बशीर अहमद, डॉ. मुहम्मद आज़म व सूफी फैयाज़ अहमद यांचे मार्गदर्शन लाभले.

## मोहंमद इब्राहिमचा पहिला रोजा



नगर – झेंडीगेट येथील मोहंमद इब्राहीम याने रमजानचा पहिला रोजा पुर्ण केला. त्याचे वय ७ वर्ष असून तो एटीयु जदीद प्रायमरी चांद सुलताना हायस्कुलमध्ये शिकत आहे. कार मॅकेनिक हाफीज शुरैक शेख यांचा मुलगा आहे. त्याने एवढया कडक उन्हात उपवास पुर्ण केल्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रज्ञाशोध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा ३० मार्चला होणार गौरव

नगर – अहिल्यानगर प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ परीक्षेतील गुणवत्ता यादीत स्थान पटकविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ ३० मार्च रोजी सकाळी १० वाजता केडगाव, पुणे रोड येथील निशा लॉन्स मध्ये आयोजित करण्यात आला आहे. सदर परीक्षा १९ जानेवारी रोजी जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात आली होती. या मध्ये शालेय विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

इयत्ता ४ थी, ५ वी, ७ वी, ८ वी करिता मराठी व इंग्रजी माध्यमातून या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. मराठी माध्यमाच्या गुणवत्ता यादीत अकराव्या व इंग्रजी माध्यमाच्या एक ते पाच स्थानापर्यंत असलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. सर्व इयत्ताचे प्रथम तीन क्रमांकासाठी प्रमाणपत्र गौरव चिन्ह व रोख बक्षीस देण्यात येणार आहे. या परीक्षेच्या निकालासह गुणवत्ता यादी प्रकाशित झाली असून, संबंधित विद्यार्थी, पालक, शिक्षक व मुख्याध्यापक यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी www.vpahmednagar.in या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांचा गौरव समारंभास उपस्थित रहावे.

डॉ. हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान व विद्या प्रतिष्ठान (महा.) व्द्वारा संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, केडगाव द्वारा आयोजित अहिल्यानगर प्रज्ञाशोध परीक्षेचे गेल्या ३४ वर्षापासून यशस्वी आयोजन करण्यात येते. या परीक्षेची विश्वासार्हते मुळे दिवसेंदिवस विद्यार्थी संख्या वाढत आहे. या कार्यक्रमात बालकाच्या शैक्षणिक वाटचालीसंबंधी तज्ज्ञांकडून मार्गदर्शन दिले जाणार आहे. संबंधित पालक व शिक्षकांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन परीक्षेचे संचालक व परीक्षा नियंत्रकांनी केले आहे.

# रंग नाविन्य, चैतन्य, यश व समृद्धीचे प्रतीक : जगदीश झालानी

नगर – रंगपंचमी हा सण होळी नंतर पाचव्या दिवशी साजरा केला जातो. भगवान श्रीकृष्णाने गोकुळामध्ये रंगपंचमीचा सण सुरू केला होता. रंगपंचमीच्या सण हा सकारात्मक ऊर्जा देणारा तसेच रंग नाविन्याचा, रंग चैतन्याचा, रंग यशाचा, रंग समृद्धीचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी यांनी केले आहे.



हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये रंगपंचमीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये रंगपंचमीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

या रंगपंचमी सणाचा आनंद विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांनीही घेतला. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या रंगाची माहिती व्हावी. विद्यार्थ्यांनी नैसर्गिक रंग खेळावे. वेगवेगळ्या रंगाप्रमाणे वेगवेगळ्या कल्पना विद्यार्थ्यांना सुचाव्या यासाठी रंगपंचमी सणानिमित्त खेळूया रंग नवचैतन्याचे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, असे प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे यांनी सांगितले.

# सावेडीत भागवत कथेस प्रारंभी चिन्मय भक्ती साधना पुस्तकाचे प्रकाशन

नगर – अहिल्यानगर येथील चिन्मय मिशन च्या वतीने नगरकरांसाठी भागवत कथा ज्ञानयज्ञ आयोजित करण्यात आले असून सावेडी येथील माऊली सभागृहात दीप प्रज्वलनाने भागवत कथेस प्रारंभ करण्यात आला. यावेळी दीप प्रज्वलनास जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज मंडळाचे सचिव अँड. विश्वासराव आठरे, निखिल वारे, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, मिशनचे अध्यक्ष अँड. डी.डी. घोरपडे, सचिव डी.डी. मोरे, खजिनदार उत्तमराव साळुंखे, शिवाजीराव ढोले, आर.एस.निमसे, विजय दळवी, एस.के. गायकवाड, आर.जी. शिर्के, हनुमंत लव्हाट, हभप विद्याताई हारदे, मंगला अष्टेकर, सुशीला वाघ, मनीषा पाठक, पद्मावती ढोले, मंदाकिनी मोरे, शकुंतला साळुंखे आदी उपस्थित होते.



चिन्मय मिशन द्वारा चिन्मय भक्ती साधना पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. (छाया – विजय मते)

भागवत कथाकार स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी प्रास्ताविकात कथेचे महत्व विशद केले ते म्हणाले भागवत कथा श्रवणाने मानवाचे खूप मोठे कल्याण होते, जीवनातील अंधःकार दूर होतो, पापांमधून मुक्ती तर मिळते पण मोक्ष सुद्धा मिळतो. भागवत कथा ही सर्वांना ऊर्जा देणारी अशी शक्ती आहे.

यावेळी अहिल्यानगर चिन्मय मिशन द्वारा स्मरणिका चिन्मय भक्ती साधना या पुस्तकाचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी मिशनचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहे. २७ मार्च पर्यंत रोज दुपारी दोन ते सहा पर्यंत कथा श्रवणाचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

